मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)
सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत

अनुक्रमणिका

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

युगवाणी

विदर्भ साहित्य संघाचें मुखपत्र

* या अंकांतील लेखक *

रा. अ. काळेले

शरच्चन्द्र मुक्तिबोध

प्रा. प्रभाकर माचवे

सौ. सरस्वतीबाई सुभेदार

वि. वि. करंबेलकर

प्रा अ. ना. देशपांडे

*

विदर्भ साहित्य संघ, नागपूर
दुर्मिळ ग्रंथ संपदा

संपादक

वा. ना. देशपांडे

सप्टेंबर १९४७ किंमत ८ आणे

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

संपादकीय पत्रव्यवहाराचा पत्ता—
वामन नारायण देशपांडे
संपादक 'युगवाणी'
टिळकवाडी, यवतमाळ (वऱ्हाड).

युगवाणी

व्यावसायिक पत्रव्यवहाराचा पत्ता—
द. ना. ठाकूर,
महेश्वर प्रेस, मुधोळकर पेठ,
अमरावती (वऱ्हाड).

अनुक्रमणिका

★ ★ ★

कविता

१ प्रयाण—पांडुरंग श्रावण गोरे ... २६७
२ आमच्या काळांत—
रा. अ. काळेले, बी. ए. ... २६८
३ मळकें उदास—
शरच्चंद्र मुक्तिबोध, एम्. ए., एल्.एल्. बी.... २६८
४ दृष्टिपथीं ये—मनोहर शिरवाडकर २६८
५ संगीत—प्रा. प्रभाकर माचवे, एम्. ए. २६९
६ माझें बाळ—सौ. सरस्वतीबाई सुभेदार २६९

साहित्यिकाचा परिचय

१ प्रभाकर श्रीपाद कोल्हटकर—'परिचित' ... २७०

प्रबंध

१ 'प्रीतिपथावर'-प्रस्तावना—
वा. ना. देशपांडे २७२
२ योगसूत्रांत ईश्वराचें स्थान—
वि. वा. करंबेळकर, एम्. ए. २७६
३ केशवसुतांची स्वप्नसृष्टि—
श्रीराम अत्तरदे, एम्. ए. २८१
४ वाङ्मयाचें मूल्यमापन—
प्रा. अ. ना. देशपांडे, एम्. ए. ... २८६

ललितगद्य

१ स्पेनमधून आलेली विधवा—
द. चिं. सोमण २९८
२ तिरपी मान—
'शांताराम', एम्. ए. ३०१

विविध

१ साहित्यसमालोचन ३०५
२ संपादकीय ३०६

●

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विदर्भ-साहित्य-संघाचें मुखपत्र

युगवाणी

वर्ष २ रें
अंक ९ वा

: संपादक :
वामन नारायण देशपांडे

सप्टेंबर
१९४७

प्रयाण

कशाला ही आता भेट-रोखतां का पायवाट?

नका कोणी मन मोडूं
लागे गोड बोल कडू!
फुलांची या खंदळी-फुलवितां कशी कळी?

उलंगला बाग उभा!
आणतां त्या कशी शोभा?
झाडाला न राही पान-वाळलें हिरवें रान!

लागे पाखरू उडाया
करतां का खोपा वाया?
भडकली आग अंगीं-निजवितां का पलंगीं?

पडूं द्या जागीं ओसाड
भोवताल सोडा *भीड!
उदासलें मन पुरें-"राहूं जाऊं" जीव करे!

टाकतां का पायीं बेडी
काढा कवाडाची कडी.
राहण्याची नाही गोडी-सवारली× आता गाडी

नका लावूं नेत्रा शेला
"राम राम" जातां बोला!

—पांडुरंग श्रावण गोरे.

---

* गर्दी. × तयार केली.

*

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

आमच्या काळांत—

आमच्या काळांत—
दुष्काळ–कदन्न–उपासमार
हालअपेष्टा–दैन्य–लाचारी–लक्तरें

आमच्या काळांत—
अनर्थ–हिडीस हत्या–हिंस्र रक्तसांड
उत्पात–उच्छेद–उच्छाद
विध्वंस–राखरांगोळी·

आमच्या काळांत—
अशान्ति–उलटापालट–उलथापालथ
अन्धतामिस्र

आमच्या काळांत—
सर्वाहुति—!

आमच्या काळांत—
धन्य काळांत !–
घडलें जात आहे–
उद्याचें रामराज्य !

—रा. अ. काळेले.

●

मळकें उदास—

मळकें उदास ओंगळ आभाळ
झिरपे संतत सांज नी सकाळ
गडद धुक्यांत दिवस झाकले
जग हें सारेंच शोकांत बुडालें !
पहाट दुपार सांजेचे सुरंग–
विराले, उरला काळोख अभंग
पडून बर्फ तें शरीरावरतीं
जायाच इंद्रियें न्हावींत क्षणी तीं !
बधीर ! थांबावें चलनवलन
उराचें थिजावें क्षणैक स्पंदन
तेवींच मळक्या रडक्या नि धुंद
दिसानें करून सर्व क्रिया बंद
पांगळें करून डांबलें जिवाला
एकटा भेटलों एकटा स्वतःला–
नित टाळलेल्या हृदय–देशांत
अंतर्देशांतल्या महाएकांतांत
कित्येक युगांच्या थडग्याखालती
प्रीतीच्या प्रेताची निजलेली मूर्ती !
तेथेंच नेऊन सोडलें जिवाला
अनंत दुःखाचा लोटला उमाळा
ठिकऱ्या–ठिकऱ्या मृत्तिका पात्राच्या
न्हाव्यात, अथवा सुगंधें धूपाच्या–
क्षणेक जळून राखच उरावी !
कशी हो प्रीतीची माधुरी सरावी ! !

शरीरें दोन तीं, प्राण तो एकच !
हृदयें दोन तीं, धड्धड एकच !
अत्यंत उत्कट प्रीतीच्या गंधानें
नितळ पूर्णिमा दर्वळे वासानें
अजून अस्थिर प्राण हे होतात
उरली प्रीती ती स्मृतीच्या रूपांत– !

आतडीं उरींचीं पिळवटावयाला
तनूंच्या अणूंना ऋंदवावयाला
एकाकीं भेटतां ऊर हें दुबळें
अंतर्हृदयांत कधी हो एकलें !
विंधून विंधून स्मृती ती शरांनी
दुःखातिरेकानें टाकते गांजूनी !

पुष्टशा कोळ्याच्या जाळ्याच्या गुंत्यांत
तड्फडे माशी ती, गुरफटे तयांत
जीव कासावीस उरीं लागे जाळ
मळकें उदास ओंगळ आभाळ !

—शरच्चंद्र मुक्तिबोध

●

दृष्टिपथीं ये—

लपवित मागे खेडें ओस
दृष्टिपथीं ये पडकी वेस
तळीं शिलांची ढाळी रास
चिरांमधूनी असंख्य, टाकी दुःखाचे श्वास !

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

भकास मंदिर अन् शेजारीं
ढासळलेला कळस केशरी !
अथांग खाली डोह विषारी
विशाल अथवा विळखा घालुन नाग पडे दारीं !

जवळ वडाचा व्यर्थ पसारा
विहगांना ना येथे थारा !
मधमाशांचा भयद दरारा !
उदासलेल्या पर्णांमधुनी किरकिरतो वारा !

चरके येतां आत अंतरीं
ठेवुन उघडीं दारें सारीं
उध्वस्त उभीं घरें बिचारीं
येईल कुणी आस असे वा अजुनी काय उरीं !

ओस तशी ही इथे चावडी
याच आसनीं, उच्च, लाकडी
बसे–कुठे पाटील पहाडी ?
कानांत घुमे–कुठे निमाला गल्बला रांगडी !

विहीर एकट मध्यावरती
पाण्याला तर येई भरती
त्यावर पानें पडती, कुजती !
चहुबाजूंनी रमणींचा ना वेढा यापुढती !

दूर सारुनी झुडुपें दाट
निघे येथुनी पाउलवाट
चढे शिवाचा डोंगर राठ
घोर कहाणी सांगाया वा जाई वर दूत !

—मनोहर शिरवाडकर

●

संगीत

[जर्मन कवि रिल्के याच्या कवितेवरून]
संगीत !
प्रतिमांचा श्वासोच्छ्वास,
चित्रांची स्तब्धता,
नि शब्द जेथ संपलेत तेथील शब्द–नाद,
विरणाऱ्या हृदयांच्या वेदीवर घुटमळतो जणू
काळ !
भावनांचें पैलतीर,
भावाचें श्रव्य–दृश्य रूपांतर,
अनपेक्षित अतिथिप्राय !
दिक्काल आम्हांला व्यापून उरलेला,
हृदय–दिशा ! आभ्यंतर !
भरतीने दूर दूर जाणारी गूढ अशी
आठवण निरोपाची,
आतील सर्व आम्हां नेहमीच्या क्षितिजासम
वेढतसे चहूकडून !
वाऱ्याचें टोक,
शुद्ध,
भव्य,
अधिक आतआत राहूं शकणार न जें,
तेंच संगीत !

—प्रभाकर माचवे

●

माझें बाळ

सर्व जगाचें संगीत
तुझ्या बोबड्या बोलांत
सर्व जगाचें सौंदर्य
तुझ्या लोभस मुखांत !

सुरपुरींचें अमृत
तुझ्या गुलाबी गालांत
सर्व ब्रह्मांड साठलें
तुझ्या कोवळ्या ओठांत !

सर्व जगाचें ऐश्वर्य
तुझ्या सानुल्या हातांत
सर्व जगाचें कौतुक
तुझ्या टपोऱ्या डोळ्यांत

बाळ माझें दृष्टावेल
मी तें झाकतें शेवांत !

—सौ. सरस्वतीबाई सुभेदार

●

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

प्रभाकर श्रीपाद कोल्हटकर

'परिचित'

● प्र. श्री. कोल्हटकर हे साहित्यिक म्हणून आज वाचकांपुढे झळकत नसले, तथापि त्यांच्या थोड्याच पुस्तकांतील सोज्ज्वल विनोद विसरतां येण्यासारखा नाही. त्यांचा अल्प परिचय या लेखांत करून देण्यांत आला आहे.

* * *

थोर पुरुषाचा पुत्र म्हणून जन्मास येणें ही भाग्याची गोष्ट आहे, हें तर खरेंच; पण त्यांत एक 'धोका' हि आहे : हा 'धोका' असा की, अशा पुत्राची नेहमी त्याच्या त्या थोर पित्याशीं तुलना करण्यांत येत असते आणि या तुलनेंत तो पुत्र थोडा जरी कमी पडला, तरी त्याला दूषण देण्यांत येत असतें ! रा. प्रभाकर श्रीपाद कोल्हटकर यांचा कांहीसा असाच प्रकार झाला आहे. प्रभाकरपंत हे कै. श्रीपाद कृष्ण कोल्हटकर यांचे चिरंजीव. श्रीपाद कृष्णांचा मराठी वाङ्मयांत केवढा दर्जा आहे, हें कुणास नव्याने सांगावयास नको. 'साहित्यसम्राट्' ही पदवी लावावयाचीच असल्यास तिजवर फक्त श्रीपाद कृष्णांचाच हक्क लागूं शकतो, अशीं अनेक विद्वानांची प्रामाणिक समजूत आहे. ही एकच गोष्ट श्रीपाद कृष्णांचें अनन्य साधारण महत्त्व दर्शविण्यास पुरेशी आहे.

अशा महनीय साहित्याचार्यांचा पुत्र होण्याचें भाग्य प्रभाकरपंतांना लाभलेलें आहे आणि त्याबद्दल त्यांना वाजवी अभिमानहि वाटतो. परंतु नेमक्या याच विधिघटनेमुळे की काय, प्रभाकरपंतांच्या साहित्यसेवेचा व्हावा तितका गाजावाजा झाला नसावा, असें वाटतें ! श्रीपाद कृष्णांचीं तीं कोटिबाज व अद्‌भुतरमणीय नाटकें, त्यांची ती अजरामर 'साहित्यबत्तिशी', त्यांचे ते विद्वत्ताप्रचुर प्रबंध-वगैरे वगैरे गोष्टी नजरेसमोर आल्या, म्हणजे त्यांच्या अपेक्षेने प्रभाकरपंतांची साहित्यसेवा 'वजनाने हलकी' भरते, असेंच कुणासहि वाटेल. परंतु श्रीपाद कृष्णांच्या साहित्याशीं तुलना न करतां स्वतंत्र रीतीने पाहिल्यास प्रभाकरपंतांची साहित्यसेवा उल्लेखनीय खचित आहे, असेंच कुणाहि प्रांजल व्यक्तीस कबूल करावें लागेल.

●

श्रीपाद कृष्णांना एकंदर चार मुलगे आहेत, त्यांपैकी प्रभाकरपंत हे दुसरे. या चारी मुलांत तेच फक्त पदवीधर होऊं शकले व त्यांनाच लेखनकलाहि साध्य झालेली आहे. यामुळे श्रीपाद कृष्ण हे प्रभाकरपंतांबद्दल नेहमीच उमेदीने बोलत असत. प्रभाकरपंतांनी वकील होऊन आपला व्यवसाय पुढे चालवावा अशी श्रीपाद कृष्णांची अतिशय इच्छा होती. परंतु वकिलीच्या धंद्याचें प्रभाकरपंतांना बिलकूल आकर्षण नसल्यामुळे तो योग येऊं शकला नाही ! यामुळे श्रीपाद कृष्णांस नेहमी वाईट वाटत असे; आणि, पित्याची इच्छा आपण पुरी करूं शकलों नाही, याबद्दल खुद्द प्रभाकरपंतांसहि खेद होत असला पाहिजे, हें उघड आहे.

विचित्र योगायोग असा की, प्रभाकरपंत हे अविवाहितच राहिले आहेत ! आर्थिक स्थैर्य आल्यानंतर विवाहाची बेडी पायांत अडकवून घ्यावी, अशा विचारांत ते होते. पण आर्थिक स्थैर्य आता-आतापर्यंत न येऊं शकल्याने ते अविवाहित राहिले, ते कायमचेच ! प्रभाकरपंतांची पन्नाशी उलटून गेलेली असल्यामुळे ते इतःपर लग्न करण्याच्या फंदांत पडतील, असा रंग दिसत नाही ! एरवीं तरी लग्न झालेला सुखी असतो व लग्न न झालेला दुःखी असतो, अशांतला प्रकार थोडाच आहे ?

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

बाकी, अविवाहित असले, तरी पण प्रभाकरपंत हे रूक्ष झाले नाहीत. त्यांनी आपल्या रसिकतेची चांगलीच जपणूक केलेली आहे. रसिकतेबरोबरच सौजन्यहि त्यांनी कायम टिकविलें आहे. त्यांचा मूळचा विनोदी स्वभाव अजूनहि जशाचा तसाच आहे! या विनोदाच्या बळावरच ते आपलें एकाकी जीवन घालवीत आहेत!

●

आणि, हा विनोदच प्रभाकरपंतांच्या लिखाणाचा स्थायीभाव आहे. प्रभाकरपंतांचीं प्रकाशित अशीं चार पुस्तकें आहेत: तीं म्हटलीं म्हणजे 'मानसपूजा', 'आकाशवाणी', 'मोड आणि खुर्दा' व 'ऋणानुबंधी' हीं होत. 'मानसपूजा' हा लघुकथांचा संग्रह असून 'आकाशवाणी' व 'मोड आणि खुर्दा' यांत त्यांचीं स्फुटें संगृहीत केलेलीं आहेत. 'ऋणानुबंधी' हा स्वभावचित्रांचा संग्रह आहे.—या चारी पुस्तकांत प्रभाकरपंतांच्या सौम्य विनोदाचा रिमझिम वर्षाव होत आहे. प्रभाकरपंतांच्या विनोदांत गडकरी वा अत्रे यांच्या विनोदांतला अवखळपणा नाही. त्यचप्रमाणे, त्यांचे वडील श्रीपाद कृष्ण यांच्या विनोदांतला चावरेपणाहि त्यांच्या विनोदांत नाही. प्रभाकरपंतांचा विनोद हा अतिशय मुलायम आहे. खुद्द विनोदविषयीभूत व्यक्तीने सुद्धा दिलखुलासपणाने हसावें, अशी त्यांच्या विनोदाची जात आहे! माझ्या मतें, हा लेखनगुण फार मोलाचा आहे. या एकाच गुणासाठी प्रभाकरपंतांचें नांव मराठींतील विनोदी वाङ्मयाच्या इतिहासांत नमूद व्हावयास पाहिजे. फक्कड विनोद साधणें सोपें नाही; आणि, हा विनोद सोज्ज्वल असणें हें तर मुळींच सोपें नाही! पण ही किमया प्रभाकरपंतांना साध्य झालेली असल्यामुळे अशा प्रकारच्या विनोदी लेखकांच्या श्रेणींत त्यांना स्थान मिळावयास पाहिजे.

कांही उत्कृष्ट मराठी पुस्तकांचे प्रकाशक व माजी 'संजीवनी'चे संपादक या दोन नात्यांनी सुद्धा प्रभाकरपंतांनी उल्लेखनीय साहित्यसेवा केलेली आहे. कै. सौ. लक्ष्मीबाई टिळक यांचीं 'स्मृतिचित्रें' किंवा कविवर्य गुणवंत हनुमंत देशपांडे यांचा 'निवेदन' काव्यसंग्रह—यांसारखीं अत्युत्कृष्ट पुस्तकें प्रकाशित करून प्रभाकरपंतांनी रसिकांस ऋणी करून ठेवलें आहे. हा प्रकाशनाचा व्यवसाय प्रभाकरपंतांना केव्हाच लाभदायक झाला नाही, हें लक्ष्यांत घेतलें, म्हणजे तर त्यांच्या या साहित्यसेवेचें विशेषच कौतुक करावेंसें वाटतें!

'संजीवनीं'तून प्रभाकरपंतांनी अनेक लेखिका पुढे आणल्या, ही त्यांची कामगिरीहि महत्त्वपूर्ण अशीच आहे.

●

काय कारण असेल तें असो, प्रभकरपंतांनी अलीकडे लेखनाशीं फारकत केलेली दिसते! प्रभाकरपंतांना व्यवहारांतील छक्के-पंजे ठाऊक नसल्यामुळे जगाचा त्यांना अत्यंत कटु अनुभव आला असणें शक्य आहे! तसेंच, एकाकी जीवनामुळे ते कदाचित् केव्हा केव्हा नाउमेदहि होत असावेत. पण यामुळे लेखणी सदाची गवसणींत घातली पाहिजे, असें नाही! 'ऋणानुबंधी' हें त्यांचें पुस्तक मराठींत चिरस्मरणीय होणार आहे. आणि, त्यांतील स्वभावचित्रांसारखीं आणखी स्वभावचित्रें प्रभाकरपंतांच्या लेखणींतून उतरावीं, अशीच वाचकांची अपेक्षा आहे. खेरीज, श्रीपाद कृष्णांच्या आठवणीहि त्यांनी लिहावयास हव्यात. एवढें काम केल्याखेरीज आपली सुटका नाही, असें प्रभाकरपंतांना वाटावें व त्यांच्या लेखणींतून आणखी सरस वाङ्मय उतरावें, यापलीकडे माझ्यासारख्या त्यांच्या मित्राची दुसरी काय इच्छा असणार?

● ● ●

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

'प्रीतिपथावर'–प्रस्तावना

वा. ना. देशपांडे

● कवयित्री 'पद्मा' यांचा काव्यसंग्रह 'प्रीतिपथावर' या नांवानें प्रसिद्ध झाला असून त्याला वा. ना. देशपांडे यांची प्रस्तावना जोडली आहे. 'पद्मा' या प्रसिद्धपराङ्मुख, पण प्रतिभासंपन्न कवयित्री असल्यामुळे त्यांचा वाचकांस परिचय होण्यासाठी सदर प्रस्तावना येथे देण्यांत येत आहे.

* * *

काय कारण असेल तें असो, आधुनिक मराठींत नांव घेण्याजोग्या कवयित्री अत्यल्प झाल्या आहेत, एवढें खरें. स्त्रियांत प्रज्ञा-प्रतिभा मुळांतच कमी असते, अशी येथे कुणी स्त्री-द्वेष्टा कदाचित् मखलाशी करील! जर्मन तत्त्वज्ञ शोपेनहॉर याने "स्त्रियांचे केस लांब, पण मेंदु आखूड असतो!" अशी टवाळी केलीच आहे की नाही?–पण ही सारी स्त्री-निंदा व्यर्थ आहे : क्युरी, पर्ल बक, सरोजिनी नायडू-प्रभृतींचें महान् कार्य डोळ्यांपुढे येतांच स्त्रियांच्या योग्यतेसंबंधींच्या संशयाचे ढग तावडतोब वितळून जातील!

बाकी, इतकें त्ररीक खरें की, प्रज्ञा–प्रतिभा असूनहि स्त्रियांना बौद्धिक कार्यास सर्वस्वीं वाहून घेणें प्रायः अवघडच जातें.—निदान हिंदुस्थानांत तरी अशीच परिस्थिति आहे! एक तर, निसर्गानें स्त्रियांवर मातृत्व लादलेलें असल्यामुळे त्यांच्या कार्यशक्तीस मर्यादा पडल्या आहेत. (आता, कोणत्याहि बौद्धिक कार्यापेक्षा मातृत्वाची मातब्बरी अधिक आहे, ही गोष्ट निराळी!) दुसरें असें की, आपल्याकडे स्त्रियांना व्यापक अनुभव येण्यास वावच राहात नाही. अशा अनुभवाखेरीज त्यांच्या लेखनांत सखोलता यावी तरी कशी? बरें, वाङ्मयांतून मोकळेपणानें हृदयाविष्करण करावें म्हटलें, तर मर्यादशीलपणाच्या कल्पनेची सासूबाई लगेच डोळे वटारून पाहूं लागते!–अशा विपरीत परिस्थितींत स्त्री-वर्गाची कुचंबणा झाल्यास त्यांत आश्चर्य तें कोणतें?

या सर्व अडचणींवर मात करून ज्या स्त्रियांनी वाङ्मयसेवा केली, त्यांची खरोखर तारीफच करावयास हवी. अलीकडे मराठींत कथाक्षेत्रामध्ये स्त्रियांनी पुरुषांच्या बरोबरीनें कामगिरी बजाविली आहे, हें सर्वश्रुतच आहे. कवयित्रींबाबत आधुनिक मराठी कविता तेवढी भाग्यवान् नाही, याला काय उपाय आहे? नाही म्हणावयाला, लक्ष्मीबाई टिळक, मनोरमा रानडे–यांच्यासारख्या दिवंगत आणि संजीवनी मराठे, इंदिरा संत–यांच्यासारख्या विद्यमान कवयित्री काव्यप्रांतांत तुरळक झळकतांना आढळतात. विद्यमान श्रेष्ठ कवयित्रींच्या मालिकेंत 'प्रीतिपथावर' या काव्यसंग्रहाच्या लेखिका 'पद्मा' यांचाहि समावेश करावयास पाहिजे.

'प्रीतिपथावर' या संग्रहांतील कवितांत पद्मा यांचें जें व्यक्तिमत्व उमटलें आहे, तें वाचकांस प्रतीत होण्याची पार्श्वभूमि तयार व्हावी, म्हणून येथे त्यांची थोडक्यांत माहिती देतों. पद्मा या आपल्या फुटकळ कविता अगर त्यांचा संग्रह स्वतःच्या संपूर्ण नांवानें प्रकाशित करण्यास नाखूष आहेत, यावरून त्यांची प्रसिद्धिपराङ्मुखता निदर्शनास येते. तथापि त्यांच्या प्रसिद्धिपराङ्मुखतेस ढळ तर न पोचावा, पण वाचकांस त्यांची जरूरीपुरती माहिती तर व्हावी, असा सुवर्णमध्य साधून त्यांचा त्रोटक परिचय करून देतों.

पद्मा यांचा जन्म एका खानदानी सरदार–घराण्यांत झाला. अर्थात् त्या चांदीचेंच काय, पण सोन्याचें गोकर्ण तोंडांत धरून जन्मल्या आहेत! त्यांच्या बुद्धिमत्तेची साक्ष त्या बी. ए. होऊन मराठींत पहिल्या आल्या, या गोष्टीवरून पटेल. अशी ही सुलक्षणी पोर एखाद्या राजघराण्यांत पडावी असें तिच्या आप्तेष्टांस वाटल्यास

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

त्यांत वावगें तें काय होतें ? परंतु पद्मा यांच्या मनाच्या घुमटांत प्रीतिदेवीचे पदध्वनि आधींच उमटावयास लागले होते ! त्यांच्या या निवडीस प्रथम विरोध झाला; पण अखेरीस पद्मा यांचा त्यांनी मनानें वरलेल्या तरुणाशीं प्रीतिविवाह झाला ! पद्मा यांच्या 'बंडखोर' वृत्तीची या प्रसंगावरून चुणूक दिसून येईल. 'पाऊलवाट' कवितेंत त्यांनी

परक्याची पाऊलवाट ही मान्य नसे मज मुळीं !
बनविन वाट मीहि वेगळी !

—असे तडफदार उद्गार काढले आहेत, ते उगीच नव्हत !

पद्मा यांच्या माहेरीं पोथ्यापुराणें व कथा–कीर्तनें नित्य होत असल्यामुळे मराठी कवितेचें त्यांस, जणू काय, बाळकडूच मिळालें ! याचा परिणाम असा झाला की, त्या दहाव्या-अकराव्या वर्षापासूनच काव्यलेखन करूं लागल्या. पुढे एरंडवणें येथे शिकत असतां कै. वा. म. जोशी यांच्यासारख्याचें शिक्षण आणि उत्तमोत्तम ग्रंथांचें वाचन यांमुळे पद्मा यांच्यांतील कवित्वाचा अंकुर वाढीस लागून त्याचा वृक्ष बनला. तथापि हा वृक्ष फुलीं–फळीं येण्यास पद्मा यांची प्रीतीच कारणीभूत झाली ! पद्मा यांच्या आवडत्या कवींत रवींद्रनाथ टागोर हे प्रमुख आहेत. आधुनिक मराठी कवींपैकीं गडकरी, बालकवि, तांबे, यशवंत वगैरेंवर त्यांचा विशेष भर आहे. त्यांच्या कांहीं कवितांवर यां कवींची कमीजास्त प्रमाणांत छापहि पडली आहे, असें दृष्टोत्पत्तीस येईल.

पद्मा या सरदार–घराण्यांत जन्मल्या असूनहि त्यांचा कल समाजवादाकडे झुकलेला आहे, हें 'रशियन सप्ताहानिमित्त' यासारख्या त्यांच्या कित्येक कवितांवरून स्पष्ट होईल. समाजांतील आर्थिक विषमतेचें प्रत्यक्ष अवलोकन, समाजवादी वाङ्मयाचें वाचन व कांही समाजवादी कार्यकर्त्यांचा परिचय–यांमुळे त्यांचा असा दृष्टिकोन बनला. तथापि नव्याप्रमाणें जुन्यांतील ग्राह्यांश घेण्यासहि त्या सदैव तयार असतात. एकंदरीनें पद्मा यांच्यांत बंडखोर वृत्ति व खानदानी इतमाम यांचें मधुर मीलन झालेलें आहे, असें म्हणावयास हरकत नाही.

पद्मा यांच्या कविता 'स्फूर्ति,' 'प्रतिभा', 'सह्याद्रि'–वगैरे नियतकालिकें व विशेषतः 'संजीवनी' पाक्षिक–यांतून वेळोवेळीं प्रसिद्ध झाल्या आहेत. त्यांच्या प्रसिद्धिपराङ्मुखतेमुळे त्यांच्या कवितांचा फारसा गाजावाजा झाला नाहीं, इतकेंच काय तें. त्यांनी कांहीं नाटिकाहि लिहिल्या आहेत.

—येथपर्यंतचा त्रुटित परिचय पद्मा यांच्या कवितांतील त्यांचें व्यक्तिमत्व जाणून घेण्याबाबत पुरेसा होईल, असें मला वाटतें.

'प्रीतिपथावर' या काव्यसंग्रहांत पद्मा यांच्या ८१ कविता संगृहात केलेल्या आहेत. त्यांपैकीं सुमारें अर्ध्यामुर्ध्या कवितांचा तरी संबंध या-ना-त्या रीतीनें 'प्रेम' या विषयाशीं येतो ! या कवितांचें स्वरूप भावगीतांसारखें आहे. परंतु तेवढ्यावरून त्यांत व्यक्त झालेल्या भावना पद्मा यांच्या व्यक्तिगत आहेत, असें समजण्याचें कारण नाही. भावगीतांत प्रथम पुरुषी प्रयोग करण्यांत येतो, हें खरें; पण याचा अर्थ असा नाहीं कीं, त्यांत नेहमीच त्या त्या कवि-कवयित्रीचें आत्मचरित्र कथन केलेलें असतें. मानसशास्त्राच्या दृष्टीनें फार तर एवढेंच म्हणतां येईल की, भावगीतांत प्रगट झालेल्या विकार–विचारांशीं कवि–कवयित्रींची सहसंवेदना असते. भावगीतांतील इतरांच्या भावनाहि कवि–कवयित्री आपल्या मनाच्या मुशींत ओतून मांडतात, म्हणजेच त्यांवर स्वत्वाचा ठसा उमटवितात. तेवढ्यापुरता त्यांच्याशीं त्यांची सहसंवेदना गृहीत धरण्यास प्रत्यवाय नाही. परंतु हीं भावगीतें म्हणजे कवि–कवयित्रींचीं आत्मचरित्रेंच होत, असा निष्कर्ष मात्र नेहमीच काढतां येत नाही. पद्मा यांची प्रतिभा भावगीतात्मक (Lyrical) असल्यामुळे स्वतःच्याच केवळ नव्हत, तर स्वेतर भावना प्रगट करतांनाहि त्यांची पद्यकृति आपोआप भावगीताचाच साज धारण करते, हें लक्ष्यांत घ्यावयास पाहिजे.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

पद्मा यांनी लिहिलेलीं सारींच प्रेमकाव्यें व्यक्तिगत नाहीत, हें जितकें खरें, तितकेंच त्यांचीं कांही प्रेमकाव्यें व्यक्तिगत आहेत, हेंहि खरेंच आहे. या दोन प्रकारच्या प्रेमकाव्यांतील फरक उमगणें कठीण असलें, तरी पण तो उमगण्याचें एक गमक सांगतां येतें : प्रीतिविवाह झालेली कुलस्त्री व्यक्तिगत प्रेमकाव्यें कशा प्रकारचीं लिहील, याचें रसिकांनी स्वतःशीं अनुमान करावें आणि त्या धोरणानें पद्मा यांचीं व्यक्तिगत प्रेमकाव्यें निश्चित करावीं. अर्थात् त्यांच्या ज्या प्रेमकाव्यांत प्रेमपूर्तीच्या समाधानाचा हुंकार उमटला आहे, तींच प्रेमकाव्यें व्यक्तिगत होत, असें खरा मर्मज्ञ तरी खासच म्हणणार नाही. या रसिक कवयित्रीनें 'पहिल्या प्रीती'चा ताजेपणा अजूनहि कायम ठेवला असला पाहिजे, हें मुद्दाम सांगावयास नको. तेव्हा तिच्या कित्येक व्यक्तिगत प्रेमकाव्यांत उत्कंठा अगर आर्तता प्रस्फुट झाली असल्यास त्यांत अनपेक्षित असें काय आहे ?

पद्मा यांच्या व्यक्तिगत आर्ततापर प्रेमकाव्यांत 'वर्षर्तूच्या शोभेंत,' 'अखेरची आशा', 'मोहिनी', 'उभी मी कधिंची', 'सांग येशील ना' इत्यादि कविता येतात. यांतील पहिल्या दोन कविता त्यांच्या लग्नापूर्वीच्या—म्हणजे १९३२ पूर्वीच्या—आहेत. पद्मा यांच्या व्यक्तिगत समाधानपर प्रेमकाव्यांची संख्या याहून अधिक आहे. त्यांत आरंभींच्या 'अर्पणा'पासून तों 'तुझें दर्शन'पर्यंत अनेक कविता येतात. "माझ्या जीवनांत तूंच अर्थ निर्माण केलास व मला हसत जगावयाला तूंच शिकविलेंस" ('अर्पण'); अंतरींची तीव्र जळजळ (तुझे सुंदर नयनचंद्र पाहून शांत झाली) 'सांगुं काय मी कुणा', तुझी हृदयनाथाची पूजा करीत असतां दुसऱ्या प्रभूचें पूजन करावयाचें काय काम आहे ? ('ध्यानमग्न'); मी तुझी सहचरी असतां तूं असा खिन्न का ?-तुझ्याबरोबर मी कुठेहि यावयास तयार आहे ! ('सहचरी तुझी मी'); तुझें—माझें पटत नाही. म्हणून लोक म्हणतात; पण तुला—मला जें मिळतें, तें त्यांस मिळत नसल्यानें त्यांना असा मत्सर वाटतो ! ('वदतात लोक सारे'); तूं अनक पैलू असलेला हिरा आहेस व तुझ्या नव्या—नव्या पैलूचें नवें—नवें तेज मला नित्य दिसतें ! ('तुझें दर्शन') " —अशा प्रकारें परोपरीनें पद्मा यांनी आपल्या वल्लभास आळविलें आहे ! त्या सर्वच कवितांचा कुठवर उल्लेख करावा ? वाचकांनी मुळांतूनच त्या शोधून त्यांचा आस्वाद घ्यावा.

स्वतः पद्मा यांस प्रेमसाफल्याचा अनुभव आलेला असला, तथापि समाजांत प्रेमवैफल्याचींच उदाहरणें जास्त आढळतात. हा अनुभव आलेल्या स्त्रियांचीं चित्रें पद्मा यांनी कांही कवितांतून आत्मीयतेनें रेखाटलीं आहेत : एका वंचित तरुणीस प्रियकराच्या लग्नाची पत्रिका आली असतां ती त्यास सुकलेल्या अश्रूचा नजराणा पाठविते, असा 'सुकलेला अश्रु' या कवितेचा विषय आहे. 'माझं गुपित' कवितेची नायिका आपल्या मैत्रिणीपासून हृदयांतील प्रेमभावना दडवूं पाहते. ही नायिका बहुधा विवाहित असावी ! 'मजविना अपूर्ण तव जीवन' या कवितेंत भलत्याशींच विवाहबद्ध झालेली तरुणी आपल्यावाचून आपल्या पूर्वीच्या प्रियकराचें जीवन अपूर्ण राहिलें असलें पाहिजे, अशी हळहळ व्यक्त करते ! 'जीवितहार'--मध्ये दोन प्रेमी जीव लग्न होऊं न शकलें, तरी विवेकानें मैत्रीचें नातें जोडतात व ध्येयसिद्धि करतात, असें दाखविलें आहे. 'समांतर प्रवाह' या कवितेची विवाहित नायिका स्वतःच्या भजनीं लागलेल्या व खुद्द तिला अप्रिय नसलेल्या तरुणास दुरून प्रेम करण्याची विनंती करते !--याप्रमाणें प्रेमवैफल्याचें हृदयस्पर्शी प्रसंग पद्मा यांनी कित्येक कवितांत गुंफिले आहेत. त्यांवरून त्यांची व्यापक सहानुभूति निदर्शनास येते.

पद्मा यांची प्रेमाबद्दलची कल्पना उच्च प्रकारची आहे. 'प्रीतिपथावर' कवितेंत त्या म्हणतात—

प्रीतिपथावरी । चालतां चालतां
विश्वाची भव्यता । नेत्रीं भरे,
विश्वाच्या हृदयीं । प्रीतिपथ दिसे
आणि जीव हांसे । आनंदानें,
जीवितानें मज । विश्वरूप दिसे.
जेव्हा चालतसें । प्रीतिपथीं,

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

प्रेमवैफल्याच्या काव्यांपैकी 'माझं गुपित,' 'मजविना अपूर्ण तव जीवन' व 'समांतर प्रवाह' या कवितांच्या नायिका विवाहित आहेत; पण त्यांचें प्रेम 'Platonic Love' च्या जातीचें असून त्यांत पार्थिवतेला बिलकूल थारा नाही! 'जीवितहार' कवितेंतील दोन प्रेमी जीवांनी तर आपल्या प्रणयभावनेचें उन्नयन (Sublimation) करून तिचें मैत्रींत रूपांतर केलेलें असतें! पद्मा यांच्या सर्वसाधारण स्वरूपाच्या प्रेमकाव्यांतील प्रीतींत जर इतकी विशुद्धता भासमान् होते, तर त्यांच्या व्यक्तिगत प्रेमकाव्यांतील प्रीतीची फार वरची कोटि असली पाहिजे, हें वेगळें कशाला सांगावयास हवें?

प्रेमाविषयींच्या अशा उदात्त कल्पनेमुळेच की काय, पद्मा यांच्या स्वेतर भावना प्रगट करणाऱ्या चार-दोन कवितांत एक प्रकारच्या 'प्रेमपर गूढवादा' (Mysticism of Love) चा भास होतो, असें मला वाटतें. 'अज्ञात हुरहूर,' 'निर्धार' वगैरे कवितांचा साकल्यानें विचार केला, म्हणजे त्यांतील नायिका कुणी तरी आदर्श प्रियकर मनाशीं कल्पून त्याची मानसपूजा करतात व तो प्रत्यक्ष दर्शन देण्याची वाट पाहतात, असा गूढ-रम्य देखावा मनश्चक्षुपुढे उभा राहतो. या कवितांतील 'अज्ञात' शब्द आदर्श प्रियकरास अनुलक्षून वापरलेला दिसतो. रवींद्रनाथांच्या एका कथेंतील नायिका अशीच आदर्श प्रियकराची मानसपूजा करीत असते, हें येथे बहुश्रुत वाचकांस स्मरेल. कदाचित् या चार-दोन कविता परमेश्वरास प्रियकर कल्पूनहि रचिलेल्या असतील! सूफी कवि अथवा देवनाथादि मराठी कवि यांनी अशा धर्तीची रचना केलीच आहे की नाही?

पद्मा यांच्या कवितांत नव्या युगांतील स्त्रीचा जो आदर्श ठेवण्यांत आला आहे, तो वस्तुनिष्ठ, पण विलोभनीय आहे. ही आदर्श स्त्री प्रेमांत पडते खरी; पण प्रेम सफल झाल्यास पतीकडून पराक्रमाची अपेक्षा करते (खुळी हौस); आणि, प्रेम विफल झाल्यास रडत न बसतां जनता चरणांवर तनु-मन वाहते (प्रीतीची चाहूल); अन्याय सहन करण्यास "मी ना सत्ययुगीन आर्यमहिला!"- असें ती चक्क सांगते (प्रतिस्पर्धिनी)! "प्रेमळ पति मम देव खरोखर"-असें म्हणूनहि "परी नव्हे तो राखणवाला!"—असा ती स्वच्छ इशारा देते. (नव्या युगाची युगंधरा)! ही स्त्री मानवतेचा ध्वज उंच उभारते व समतेचीं गाणीं गाते (किसा)!—अशी ही तेजस्विनी कुणाच्या आदराचा विषय होणार नाही? आमच्या कित्येक लेखक-लेखिकांनी स्त्रीने संसार मोडून बोलपटांत शिरण्याचा जो आदर्श निर्माण केला आहे, त्याच्याशीं पद्मा यांचा हा आदर्श अवश्य ताडून पाहण्यासारखा आहे!

पद्मा यांची प्रतिभा केवळ प्रेमाभोवतीच पिंगा घालत नाही. तिने स्वतंत्रता व समानता यांचींहि गाणीं गाइलीं आहेत. त्यांपैकी 'रशियन सप्ताहानिमित्त' व 'नव्या युगाची युगंधरा' या कवितांचा आवर्जून निर्देश करावयास हवा. त्यांच्या किरकोळ विषयांवरील कवितांत 'माझें बाळ' हें वत्सलगीत सुंदर आहे.

केवळ काव्यदृष्टीनें पाहिलें, तर पद्मा यांच्या 'अर्पण', 'ध्यानमग्न', 'प्रीतिसमाधि', 'जाईच्या मांडवाखाली', 'माझं गुपित', 'मजविना अपूर्ण तव जीवन', 'माझें बाळ', 'तुला पाहून', 'निराशेस' व 'नव्या युगाची युगंधरा' या कविता मला विशेष आवडल्या, हें नमूद करणें अवश्य आहे.

पद्मा यांच्या भाषेंत सहजता व कोमलता हे गुण आढळतात. त्यांनी वापरलेले छंद जुनेच असले, तरी पण त्यांत विविधता आहे. मात्र त्या 'संयोग-ऱ्हस्वास गुरुत्व देतो'—हा नियम क्वचितच पाळतात! कुठे-कुठे यतिभंगहि होतो!

येथवर आपण 'प्रीतिपथावर' या संग्रहांतील कवितांचें विहंगमावलोकन केलें. त्यावरून पद्मा यांच्या काव्यप्रतिभेची आणि त्यांच्या कवितांत उमटलेल्या त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची वाचकांस कल्पना येईल. पद्मा यांचीं कित्येक काव्यें कवित्वाच्या दृष्टीनें सरस-रमणीय तर आहेतच; पण त्यांत वैशिष्ट्यहि आहे, हें विशेष होय. स्त्री-प्रेमाचे विविध पैलू विपुलतेने व सरसतेनें दाखविणें, नव्या युगांतील स्त्रीचा वस्तुनिष्ठ व तेजस्वी आदर्श पुढे ठेवणें आणि समाजवादाचा स्पष्टपणें पुरस्कार

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

करणें–हीं पद्मा यांच्या कवितेचीं त्रिविध वैशिष्टयें होत. हीं वैशिष्टयें इतर कोणत्याहि मराठी कवयित्रीच्या रचनेंत इतक्या घवघवीतपणानें व एकत्रित स्वरूपांत सांपडणार नाहीत, असें मीं म्हटल्यास मजवर कुणासहि गौण लेखल्याचा आरोप येऊं नये. आरंभीं मीं दिग्दर्शित केल्याप्रमाणें स्त्रियांत प्रज्ञा–प्रतिभा असण्यास निसर्गाची कांहीहि हरकत असूं शकत नाही! माझ्या त्या विधानास पुष्टि देईल, अशाच योग्यतेचा हा काव्यसंग्रह आहे. पद्मा यांना उज्ज्वल भविष्यकाळ आहे. त्यांनी शारदेची उपासना अशीच चालूं ठेवल्यास त्यांना मराठी काव्यवाङ्मयांत उत्तरोत्तर अधिकाधिक यश प्राप्त होईल, हें भविष्य वर्तविण्यास ज्योतिषीच कशाला हवा?

● ● ●

योगसूत्रांत ईश्वराचें स्थान

विनायक वामन करंबेलकर, एम्. ए.,
वेदान्ततीर्थ, साहित्याचार्य इ.

● नागपूरचे रा. करंबेलकर हे तरुण व्यासंगी लेखक आहेत. त्यांचा हा लेख योगशास्त्राच्या अभिमान्यांस खळबळ करणारा वाटेल. सांख्यांनी न मानलेला ईश्वर पतञ्जलीच्या योगसूत्रांत का मानण्यांत आला आहे, असा प्रश्न उपस्थित करून त्याचें ' योगसूत्रांत केवळ लोकाराधनेसाठी ईश्वर मानण्यांत आला असावा ' असें करंबेलकरांनी उत्तर दिलें आहे!

* * *

सांख्य आणि योग

सांख्य आणि योग हीं जुळीं दर्शनें असून त्यांच्या भूमिका समान आहेत, हें सर्वविश्रुत आहे. फक्त सांख्य हें बौद्धिक तत्त्वज्ञान आहे, तर योग हा क्रियाप्रधान आहे; व दुसरा फरक म्हणजे सांख्यांनी ' ईश्वरतत्त्व ' मानलेलें नसल्यामुळे त्यांचें शास्त्र ' निरीश्वर सांख्य ' म्हणून समजलें जातें, तर योग्यांनी ' ईश्वरतत्त्व ' मानलें असल्यामुळे त्यांच्या शास्त्रांस ' सेश्वर सांख्य ' म्हणून ओळखतात.

आता, सांख्यांनी जें निरुपयोगी म्हणून टाकून दिलें तें ' ईश्वरतत्त्व ' योगशास्त्रानें स्वीकारण्याचें कारण काय? सांख्य जें कार्य आपल्या पंचवीस तत्त्वांवर करूं शकलें, तें कार्य करण्यास योग्यांना तेवढीं पंचवीस तत्त्वें अपुरीं वाटलीं व म्हणून त्यांना हें सव्विसावें ' ईश्वरतत्त्व ' मानावें लागलें काय? किंवा, त्यामुळे त्यांना कांही विशेष कार्य साधावयाचें होतें? किंवा, इतर कांही कारणामुळे हें ' ईश्वरतत्त्व ' योग्यांवर लादलें गेलें? असले कांही प्रश्न आपणास विचारांत घ्यावयाचे आहेत.

ईश्वरतत्त्वाची अनवश्यकता

सांख्य ईश्वर मानीत नाहीत, याला कारणें आहेत: त्यांच्या शास्त्रानें ईश्वराचें अस्तित्वच सिद्ध होऊं शकत नाही. कारण ईश्वर म्हणून कोणी पुरुष अस्तित्वांत असेल, तर तो बद्ध तरी असेल, किंवा मुक्त तरी असेल. जर बद्ध असेल, तर जन्ममरणाचें चक्र त्याच्या मागे लागणारच आणि मग विश्वोत्पत्ति–व्यवस्थादि कार्य त्याला कसें शक्य होईल? शिवाय, तो अज्ञ, दुःखी, निःसहाय–वगैरे असतो, तेव्हा विश्वकार्यें त्याला समजणार देखील नाहीत! बरें, ईश्वर हा मुक्त पुरुष आहे म्हणावें, तर मुक्त पुरुष हा निरभिलाष असतो, त्यामुळे संसारचक्रांत तो निष्कारण का हात घालील? त्यामुळे बद्ध व मुक्त या अवस्थांशिवाय एखाद्या पुरुषविशेष ईश्वराची कल्पना करवत नाही.

शिवाय ईश्वराच्या अस्तित्वाची, सांख्यांच्या मतें, आवश्यकताहि नाही. प्रकृति व पुरुष या दोहोंच्या साह्यानें सृष्टिव्यवहाराची उपपत्ति योग्य रीतीनें लावतां येतें. मग नवीन ' ईश्वरतत्त्व '

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मानून कल्पनागौरव का करावा? याप्रमाणें सांख्यशास्त्राचा विरोध असून देखील सांख्याशीं इतर सर्व बाबतींत जुळतें घेणारें योगशास्त्र 'ईश्वर-तत्त्वां' च्याच बाबतींत वेगळें का झालें?

सांख्यांच्या तत्त्वांहून निराळें असें 'ईश्वरतत्त्व' मानून त्याची सिद्धि, त्याचें प्रयोजन व त्याची उपपत्ति यांची जबाबदारी योग्यांनी आपल्यावर घेतली. योग हें एक षड्दर्शनांतील दर्शन असल्या-मुळे इतर सर्व दर्शनांप्रमाणें त्याचेंहि कांही पारि-भाषिक शब्द आहेत. त्यांतील कांही शब्दांवर भाष्यकार व टीकाकार यांतील मतभेद पाहून पतञ्जलीनें कांही अर्थ ठरवून मगच परिभाषा वापरल्या आहेत किंवा नाही, अशी शंका कांही जणांनी काढली आहे. पण तिला जास्त महत्त्व देण्याचें कारण नाही.

मॅक्सम्यूलरचें मत

कारण मॅक्सम्युलरसुद्धा म्हणतो, "After the study of so many years, I have come to the conviction that the Indian Shastrakaras do not use words without meaning. Also they do not uphold any opinion for fear of or to flatter people" ['Six Systems of Philosophy'] म्हणून आपल्या परिभाषा ठरवितांना पतञ्जलीनें 'ईश्वर' या परिभाषेचा अर्थ निश्चित केला असेलच. त्या अर्थाला धरून 'ईश्वर' हें तत्त्व सामञ्जस्यानें योगशास्त्रांत बसतें किंवा नाही, हा प्रश्न आहे.

ईश्वरविषयक अकरा सूत्रें

एकशें चौऱ्याण्णव सूत्रांच्या योगशास्त्रांत ईश्वर-विषयक पहिल्या दोनच अध्यायांत आलेलीं फक्त अकरा सूत्रें आहेत. त्यावरून आपणास पुढील माहिती मिळते: "किंवा ईश्वराच्या प्रणिधानानें समाधि अवस्था प्राप्त होते." (१-१-२३); "क्लेश, कर्म, विपाक, आशय यांपासून अलिप्त असा पुरुष-विशेष म्हणजे ईश्वर." (१-१-२४); "त्याच्या ठिकाणीं सर्वज्ञतेचीं अनिर्बंध बीजें असतात." (१-१-२५), "तो हा प्राचीनांचा देखील गुरु; कारण तो कालानें अवच्छिन्न नाही." (१-१-२६); "प्रणव हा त्याचा वाचक शब्द आहे." (१-१-२७); "त्याचा सतत जप करावा व त्याच्या अर्थाचें मनन करावें." (१-१-२८); "त्यापासून प्रत्यक् चेतनेचें ज्ञान होतें व विघ्नेंहि नाहीशीं होतात." (१-१-२९); "तप, स्वाध्याय व ईश्वरप्रणिधान हे क्रियायोग होत." (१-२-१); "शौच, संतोष, तप, स्वाध्याय व ईश्वरप्रणिधान हे नियम होत." (१-२-३२); "स्वाध्यायामुळे इष्ट देवतेची प्राप्ति होते" (१-२-४४); "ईश्वरप्रणिधानामुळे समाधीची सिद्धि होते." (१-२-४५).

या सूत्रांवरून पतञ्जलीच्या मतें ईश्वर हा विशेष प्रकारचा पुरुष आहे; तो निरतिशय सर्वज्ञ आहे; जन्ममरणादि संसारबंधनांपासून तो निर्मुक्त आहे; योगशास्त्राच्या गुरुपरंपरेंतील तो प्राचीनतम गुरु आहे; तो कालबंधनापलीकडे आहे; ॐ हा त्याचा वाचक शब्द आहे; त्याच्या प्रणिधानानें समाधि सिद्ध होते.

यावरून आपणास असें स्पष्ट दिसून येतें की, योगसूत्रांत पतञ्जलीनें ईश्वराचें अस्तित्व गृहीत धरलें आहे. कारण त्याचें अस्तित्व सिद्ध करण्यासाठीं त्यानें कसलाच पुरावा पुढें आणला नाही किंवा विवेचन केलें नाही. शिवाय त्यानें ईश्वराच्या ठिकाणीं फक्त सर्वज्ञत्वच मानलें आहे, सर्वशक्तिमत्त्व किंवा विभुत्व मानलें नाही, त्याचप्रमाणें, जगदुत्पत्तिप्रलयाचें कर्तृत्व-सुद्धा त्याच्याकडे दिलेलें नाही. हा ईश्वर तारक आहे किंवा याच्या कृपेमुळे मनुष्य दुःखापासून मुक्त होऊं शकतो, अशी देखील कल्पना योग-सूत्रांत आढळत नाही. योगसूत्रांतील ईश्वर हा देखील एक पुरुषच. फक्त फरक इतकाच की, तो इतर पुरुषाप्रमाणें अल्पज्ञ नसतो, जन्ममरणांनी म्हणजे कालानें बांधलेला नसतो,—तो अनादि व अनंत असतो, तसेंच इतर पुरुषांप्रमाणें क्लेश, कर्म, विपाक, आशय यांनी लिप्त नसतो. म्हणूनच त्याला 'पुरुष-विशेष' असें म्हटलें आहे. परंतु त्याचें स्वरूप काय, जगताचा आणि त्याचा संबंध आहे किंवा नाही, तो सक्रिय आहे की निष्क्रिय,

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

तो राहतो कोठे—इत्यादि प्रश्नांना योगसूत्रांत उत्तर आढळत नाही. फक्त तो 'प्राचीन गुरूंचा देखील गुरु' म्हणून अद्यापि देखील तो योगशास्त्राचा गुरु समजावा. जरी साक्षात् त्याच्या कृपेने जीव संसारबंधनांतून मुक्त होऊं शकत नसले, तरी अप्रत्यक्षपणें तो उपयोगी पडतो. म्हणजे, ईश्वराचा वाचक शब्द ॐ, त्याचें प्रणिधान केलें म्हणजे समाधींतील विघ्नें नष्ट होतात व समाधि सिद्ध झाली, म्हणजे क्रमाक्रमाने कैवल्यलाभ होतो.

पतञ्जलीने योगसूत्रांत ईश्वराचें अस्तित्व सिद्ध करण्याचा प्रश्नच उपस्थित केला नाही, हें आपण पाहिलें; पण याहि पुढे जाऊन असें म्हणतां येईल की, पतञ्जलीची ईश्वरविषयक सूत्रें ईश्वराविषयीं असा परिचित निर्देश करतात की, त्यामुळे ईश्वराची सिद्धि ही वादविषयच होऊं शकत नाही. ईश्वर हा स्वतःसिद्ध, सार्वत्रिक व सर्वमान्य आहे. अर्थात् सांख्यांनी अजिबात न मानलेला व योगांत गृहीत धरलेला हा ईश्वर पतञ्जलीने कशाच्या आधारावर आपल्या सूत्रांत निर्दिष्ट केला, हा प्रश्न उरतोच.

एक कोटी

या ईश्वराच्या अस्तित्वसिद्धीबद्दल एकाने, (डॉ. ज्वालाप्रसाद-'Introduction to Indian Philosophy, पान ११०) अशी कोटी लढविली आहे की, सांख्यांच्या पंचवीस तत्त्वांहून अधिक असें हें ईश्वरतत्त्व योग्यांनी मुद्दाम मानलें आहे. कारण, त्रिगुणांच्या साम्यावस्थेंत असलेली प्रकृति अव्यक्त स्वरूपांतच असते. ती व्यक्तस्वरूपांत येण्याकरिता तिच्या तीन गुणांची साम्यावस्था ढळावयास हवी. पण हें वैषम्य निर्माण करणार कोण? प्रकृति स्वतः जडस्वरूप असल्यामुळे तिला करतां येणार नाही व पुरुष निष्क्रिय असल्यामुळे तोहि करणार नाही. परंतु विश्वरचनादि कार्यें प्रकृति सुव्यवस्थितपणें करते, यावरून तिची साम्यावस्था ढळविणारा, तिला प्रथम चेतना देणारा प्रकृति पुरुषाहून भिन्न असा कोणीतरी असला पाहिजे व तो म्हणजे ईश्वर. ही विचारसरणी जरी सत्याभास करणारी व मोहक वाटली, तरी संपूर्णतः निराधार आहे. पतञ्जलीची ईश्वरविषयक अकरा योगसूत्रें आपण पाहिलींच. पण त्यांत प्रकृतीच्या त्रिगुणांची साम्यावस्था भंग करण्याचें कार्य ईश्वराच्या गळ्यांत अडकविलेलें आढळत नाही. प्रत्यक्ष कांहीच न करणारा हा योगसूत्रांतील ईश्वर तसल्याच प्रकारच्या सांख्यांच्या 'ज्ञ' प्रमाणें आहे. आणि, ईश्वराला 'पुरुषविशेष' म्हणण्यांत प्रकृतीच्या कार्याबद्दल तो उदासीन आहे असेंच दर्शित करण्याचा पतञ्जलीचा हेतु असावा. त्यामुळे प्रकृतींत वैषम्य निर्माण करण्याकरितां योग्यांनी ईश्वराचें अस्तित्व मानलें, हें म्हणणें भ्रामक ठरतें.

या ठिकाणीं दोन योगसूत्रांचा विचार आवश्यक आहे. पहिलें म्हणजे "तपःस्वाध्यायेश्वरप्रणिधानानि क्रियायोगः" [१–२–१] तपश्चरण, स्वाध्यायाध्ययन व ईश्वरप्रणिधान हे क्रियायोग होत, असें म्हटलें आहे. पण क्रियायोग म्हणजे काय, याचें उत्तर वाचस्पतीने "क्रियैव योगः" असें दिलें आहे व योग म्हणजे "योगश्चित्तवृत्तिनिरोधः" असें सूत्रकाराने सांगितलें आहे. या सर्वांवरून चित्तवृत्तींचा निरोध करण्याकरिता सांगितलेल्या आवश्यक [बाह्य] क्रिया असा सूत्रार्थ संपन्न होतो. अन्तःकरणाच्या एकाग्रतेसाठी आवश्यक अशा या बाह्य क्रियाच आहेत, असें तपश्चरण, स्वाध्यायाध्ययन, या नांवांवरूनच समजतें. शिवाय, 'समाधिभावनार्थः क्लेशतनूकरणार्थश्च' या पुढच्या सूत्रावरूनहि हेंच लक्ष्यांत येतें. क्रियायोग म्हणजे बाह्यक्रिया यापेक्षा जास्त अर्थ, निदान व्यास, भोजदेव वगैरे भाष्यकार, टीकाकार, वृत्तिकार यांच्यांत झालेल्या मतभेदावरून, देतां येत नाही. व्यास म्हणतो, "स्वाध्यायः प्रणवादिपवित्राणां जपनं मोक्षशास्त्राध्ययनं वा। ईश्वरप्रणिधानं सर्वक्रियाणां परमगुरावर्पणं तत्फलसंन्यासो वा"। या प्रमाणें ईश्वरप्रणिधान ही एक इतर दोहोंप्रमाणें बाह्य क्रिया ठरते.

ईश्वर–प्रणिधान

क्रियायोगाप्रमाणें ईश्वरप्रणिधान हें नियमांतहि अंतर्भूत केलें आहे. सूत्र १-२-३२ मध्ये—"शौचसंतोषतपःस्वाध्यायेश्वरप्रणिधानानि नियमाः"—शौचसंतोषाबरोबर ईश्वरप्रणिधान एक नियम

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मानला आहे. आता, यम, नियम, आसन, प्राणायाम, प्रत्याहार, धारणा, ध्यान व समाधि या योगसिद्धींच्या उत्तरोत्तर चढत्या पायऱ्या आहेत. कर्मेन्द्रियावर ताबा मिळविण्यासाठी सांगितलेले यम व मनोविजय यांसाठी विहित नियम या योगमार्गातील प्राथमिक पायऱ्या आहेत. त्यामुळे अहिंसासत्यास्तेयादि यम व शौचसंतोषादि नियम यांपैकी प्रत्येकाचें व्यक्तिशः जितकें महत्त्व त्यापेक्षा सर्वांचें सामुदायिक महत्त्व जास्त आहे, असें निर्विवाद ठरतें. सत्यापेक्षा अहिंसा कमी किंवा तपापेक्षा स्वाध्याय श्रेष्ठ असें ज्याप्रमाणें ठरवितां येणार नाही, त्याचप्रमाणें योगसिद्धीच्या सर्व नियमांत ईश्वरप्रणिधान श्रेष्ठ किंवा सर्व क्रिया-योगांत ईश्वरप्रणिधान अधिक, असें मुळींच म्हणतां येणार नाही.

डॉ. कीथ यांनी आपल्या 'The Sankhya System' या ग्रंथांत (पा. ६५) प्रो. टग्झेन्च्या 'Yoga' नांवाच्या ग्रंथांतून पुढील वाक्य उध्दृत केलें आहे. (पान ५६) तें वाक्य असें:- "The theory has often been held that Yoga was first atheistic, and that the theism of the classical system of the Yoga-Sutra and of the Epic alike is due to a concession to popular feeling, nor is there any doubt whatever that in the Yoga-Sutra the connection of the divinity with the system is rather a loose one." पतञ्जलीच्या योगसूत्रापूर्वी योगशास्त्र निरीश्वरवादी होतें किंवा नव्हतें, हें निश्चित सांगतां येत नसलें, तरी योगसूत्रांत ईश्वरतत्त्व थोडें सैल बसलें आहे, असें वाटण्याइतका पुरावा मात्र उपलब्ध होतो.

'ईश्वरप्रणिधानाद्वा' [१-१-२३] या सूत्रांत 'वा' अशी विभाषा आली आहे. संप्रज्ञात व असंप्रज्ञात अशी उभयविध योगसमाधि मृदु, मध्य आणि तीव्र उपायांनी अधिकाधिक सुलभतेने प्राप्त होते असें सांगितल्यावर मग हें सूत्र उपस्थित केलें आहे. म्हणजे, योगसमाधि-सिद्धीकरिता मृदुमध्यादि उपाय न करिता ईश्वर-प्रणिधान केलें, तरी देखील चालतें, अशी विभाषा देण्यांत ईश्वरप्रणिधान हें मृदुमध्यादि उपायाहून वेगळें आहे, असें ठरतें. त्या उपायांत ईश्वरप्रणिधान येऊं शकत नाही. ईश्वरप्रणिधानाचें प्रणवाच्या जप व अर्थभावना यांहून अन्य विधान कोठेहि नाही. यावरून ईश्वरप्रणिधान हें योगमार्गाचें प्रत्यक्ष अंगभूत ठरूं शकत नाही. जर तें तसें ठरतें, तर 'ईश्वरप्रणिधानेनैव' असें सूत्र पतञ्जलीने केलें असतें.

एका ईश्वराची व्याख्या देणाऱ्या सूत्राखेरीज तो शब्द योगसूत्रांत स्वतंत्रतेने कोठेंच वापरलेला नाही. सर्वत्र 'ईश्वरप्रणिधान' असा सामासिक शब्द आला आहे. हा तत्पुरुष समास असल्यामुळे प्रणिधानाला प्राधान्य व ईश्वराला गौणत्व येतें. शिवाय, प्रणिधान जें करावयाचें, तें देखील त्या ईश्वराचा वाचक जो प्रणव त्याचें. त्यामुळे ईश्वराचें प्रणिधान याला कांहीच अर्थ राहात नाही. प्रणवाचें प्रणिधान असें म्हणणें न्याय्य ठरलें असतें.

चमत्कारिक शब्द

प्रणिधान हा शब्दहि फार चमत्कारिक वाटतो. टीकाकारांनी या शब्दाचा अर्थ नवविधा भक्ति असा केला आहे, पण तो सूत्रकारालाच अमान्य आहे. त्याने 'ईश्वरप्रणिधानाद्वा' असें विधान करून 'तस्य वाचकः प्रणवः' असें ईश्वराबद्दल ॐ चें प्रतीकत्व दर्शवून 'तज्जपस्तदर्थार्थभावनम्' अशी प्रणिधानाची व्याख्या केली आहे. पण प्रणिधान हा शब्द मात्र भक्तिशास्त्रांतील आहे, हें निर्विवाद; व सूत्रकाराने त्या शब्दाचा ईश्वराच्या संबंधांत वारंवार उपयोगहि केलेला आढळतो. जर ॐ प्रतीकाची उपासनाच सूत्रकारास सांगावयाची होती, तर 'प्रणिधान' हा संदिग्ध शब्द वापरावयाचें प्रयोजन कोणतें? प्रणिधान म्हणजे जर सर्व वासनांचा व कर्म-फलांचा त्याग असें असेल, तर तें भक्तीचें गमक होईल, क्रियाप्रधान योगाचें खास होऊं शकत नाही.

'स एष पूर्वेषामपि गुरुः कालेनानवच्छेदात्' (१-१-२६) या सूत्रांत ईश्वराला प्राचीन गुरूंचा

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

देखील गुरु मानला आहे. ज्याअर्थी योगविद्या ही गुरुशिष्यपरंपरेने प्राप्त झाली आहे, त्याअर्थी जगदारंभीं ज्या पुरुषास प्रथम योग-विद्या हस्तगत झाली, त्याला गुरु कोठून असणार? परंतु 'कालेनानवच्छेदात्' असें प्रथम गुरूवरील काल-बंधन उडवून लावल्यामुळे श्रुतिविरोधी संसाराचें सादित्व व गुरुपरंपरेवरील अनवस्था प्रसंग टाळून गुरुनिरपेक्ष योगसिद्धि करणारा पुरुष व ईश्वराची कल्पना पतञ्जलीने एक करून टाकली. प्रथम योग सिद्ध करणारा पुरुष जरी योगविद्येचा गुरु होत असला, तरी त्याच्यावर ईश्वरत्व लादण्यांत पतञ्जलीचा काय हेतु असावा? निदान असें एकत्व साधण्यांत पतञ्जलीने योगशास्त्रांत ईश्वराचें अस्तित्व आणलें आहे, एवढें मानावें लागतें.

प्रणव

'तस्य वाचकः प्रणवः' या सूत्रांत [१-१-२७] ॐ हा ईश्वराचा वाचक आहे, असें म्हटलें आहे. एका पुरुषविशेष ईश्वराचा प्रणव हा वाचक शब्द आहे, म्हणजे काय, हें कळावयास कठीण जातें. ईश्वर व प्रणव यांत संबंध कोणता हा प्रश्न. सूत्र-काराच्या मतें ईश्वर हा वाच्य व प्रणव हा वाचक—ईश्वर या पदार्थाचें किंवा पुरुषाचें प्रणव किंवा ॐ हें नांव. परंतु व्यासभाष्यावरील टीका-कार वाचस्पति याला हें मान्य नाही. तो म्हणतो, "वाच्यः ईश्वरः प्रणवस्य किमस्य संकेतकृतं वाच्यवाचकत्वमथ प्रदीपप्रकाशवदवस्थितम् इति। स्थितोऽस्य वाच्यस्य वाचकेन सह संबंधः। संकेत-स्त्वीश्वरस्य स्थितमेवार्थमभिनयति। यथावस्थितः पितापुत्रयोः संबंधः संकेतेनावद्योत्यते, अयमस्य पिताऽयमस्य पुत्र इति"। त्याच्या मताने [अर्थात् तें अत्यंत संदिग्ध शब्दांत दिलें आहे] वाच्यवाचक हा एक विशिष्ट संबंध ईश्वरप्रणवांत आहे. मग तो काय वस्तुप्रतीकसंबंध आहे की, पदार्थ-नाम-संबंध आहे हें त्याचें त्यालाच माहिती!

इष्ट देवता कोणती?

सूत्र १-२-४४ मध्ये स्वाध्यायामुळे इष्ट देवतेचा संप्रयोग होतो, असें म्हटलें आहे. ही इष्ट देवता कोणती व तिचा संप्रयोग होतो म्हणजे काय? टीकाकारांनी 'संप्रयोग' शब्दाचा अर्थ 'प्रत्यक्षा भवति', 'दर्शनं गच्छति' असा केला आहे. पण देवता कोणती, याबद्दल मात्र त्यांच्यांत एकवाक्यता नाही. व्यास—'देवा ऋषयः सिद्धाश्च...' व भोज—'इष्टयाऽभिप्रेतया देवतया संप्रयोगो भवति।' असे पृथक् निर्देश करतात. पतञ्जलीच्या मतें कदाचित् पुढच्याच सूत्रांत निर्दिष्ट केलेला ईश्वर म्हणजे इष्ट देवता असेल, असें म्हणावें, तर दुसरीकडे दोष उत्पन्न होतो. स्वाध्याय आणि ईश्वर (प्रणिधान) हे एकदा क्रियायोगांत व दुसऱ्यांदा नियमांत समाधिसिद्धीस साधनभूत सांगितले आहेत व प्रस्तुत सूत्रांत एक दुसऱ्याचें साधन सांगितलें, असें होतें. म्हणजे, एखाद्या कारणाकरिता दोन साधनें सांगावीत व मग त्या दोन साधनांत एक दुसऱ्याचें साध्य आहे, असें सांगावें, अशी आपत्ति येते. दांडा आणि कुऱ्हाड यांनी लाकडें तोडतां येतात, पण दांडा हें कुऱ्हाड मिळविण्याचें साधन कसें होऊं शकेल?



अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

केवळ लोकाराधनेसाठी!

याप्रमाणें अनेक युक्तिवादांवरून योगसूत्रांत ईश्वराची कल्पना तितकी नीटशी बसली नाही, हें सहज समजून येते. सांख्यशास्त्राचा पाया घेऊन त्यावर योगशास्त्राची इमारत उभारतांना पतञ्जलीनें सांख्यशास्त्रांत नसलेली, परंतु लोकप्रसिद्ध असलेली ईश्वरकल्पना आपल्या शास्त्रांत आणण्याचा प्रयत्न केला, पण तो तितका यशस्वी झाला नाही, हें वरील विवेचनावरून आपल्या लक्ष्यांत आलें. म्हणजे रचनादृष्ट्या, प्रगतिदृष्ट्या व विभागदृष्ट्या योगसूत्रांतील ईश्वरकल्पना अपूर्ण आहे.

परंतु सांख्यांची निरीश्वरता टाकून योग्यांना सेश्वरता पत्करण्याचा खटाटोप का करावा लागला, याचें कारणहि सहज आढळणारें आहे. तें कोणास पटो किंवा न पटो, पण 'ईश्वरप्रणिधान' व 'प्रणवोपासना' या भक्ति व उपासना यांच्या गमकावरून उपनिषदांत, भगवद्गीतेंत आढळणारें प्रणव-माहात्म्य व रामायण, महाभारत, पुराणें यांमध्ये उचलून धरलेला भक्तिमार्ग पतञ्जलीला डोळ्याआड करतां आला नाही, असें वाटतें. सांख्यांचा निरीश्वरवाद पत्करून लोकविरुद्ध होण्यापेक्षा ईश्वराच्या कल्पनेला आपल्या शास्त्रांत वाव देऊन शक्य तोंवर त्याला जनानुकूल्य मिळवावें, असाच पतञ्जलीचा हेतु असावा.

केशवसुतांची 'स्वप्नसृष्टि'

लेखांक २ रा

श्रीराम अत्तरदे एम्. ए.

● रा. अत्तरदे यांच्या लेखमालेचा हा दुसरा हप्ता आहे. आंग्लाईत सरंजामदारीऐवजीं भांडवलदारीस महत्त्व येऊन व्यक्तिस्वातंत्र्य, उदारमतवादित्व, समाजसुधारणा-वगैरेंचा पुरस्कार होऊं लागला. या बदलत्या जमान्याचे केशवसुत हे प्रतिनिधी होते. त्यांना 'युगप्रवर्तक' म्हणण्याऐवजीं 'युगप्रतिनिधी' म्हणणें रास्त होईल, हा मुद्दा या लेखांकांत मांडण्यांत आला आहे.

* * *

अमका एक सन घेऊन त्यापासून नवा कालखंड सुरू झाला, असें म्हणणें फार सोपें असतें, परंतु त्यांतच मोठा प्रमाद होतो. कवि म्हणजे कांही एखादा धूमकेतु नव्हे की, जो एकदम कांही आगापीछा नसतां प्रकाशून जाईल. प्रत्येक कवि हा समाजरचनेच्या विशिष्ट विभागाचा, या-ना-त्या मार्गें, प्रातिनिधिक असतो. त्या समाजदेहापासून त्याची फारकत करतां येत नाही. मग 'चिन्ता करिती विश्वाची'—या कोटींतला तो असो, वा व्यक्तिकेंद्रित असो. कवीचे सामाजिक विचार, राजकीय दृष्टिकोन, नीतिविषयक समजुती, किंबहुना प्रेमभावनेचें स्वरूप व तिच्या व्यक्तिभवनाच्या पद्धति, बालकविषयक भावना, श्रमाबद्दलचा दृष्टिकोन—वगैरे गोष्टी त्याच्या याच पार्श्वभूमीवर आधारलेल्या असतात. वाङ्मय हें एका प्रकारें परिस्थितींतून निर्माण होणारें पीकच होय. ज्या प्रकारचें खतपाणी, हवामान, जमीन, बीं-हीं असतील, त्याप्रकारचें पीक त्या ठिकाणीं निर्माण होईल. हीच वस्तुस्थिति वाङ्मयासहि लागू पडते. अमुक एका कवीनें अमक्या विषयाबाबत अमकाच दृष्टिकोन कां मांडला, याचें कारणहि तींतच सापडेल. कवीचा तो दोष असेल वा नसेलहि, तथापि, ज्या समाजरचनेंत व अर्थव्यवस्थेंत कवि हा समाज घटक या नात्याने वावरत असतो, त्यांचें भावात्मक वा अभावात्मक, समर्थनपर वा निषेधपर, प्रतिबिंब त्याच्या काव्यांत उतरल्यावाचून राहायचें नाही. प्रसिद्ध बंगाली लेखक श्री. देवीप्रसाद चट्टोपाध्याय यांचाहि असाच अभिप्राय आहे. ते म्हणतात—"आजपर्यंतचा इतिहास हेंच ओरडून सांगतो

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

की, कवि किंवा इतर लेखक हे व्यक्तिशः प्रभाव गाजवीत नसतात, तर त्यांतील अधिक प्रभावी कवींचा कळत वा नकळत कोणत्या तरी विशिष्ट वाङ्मयीन विचारप्रवाहाशीं संबंध असतो. कवि म्हणजे कांही अंतराळांत विहरणारे आगापीछा नसलेले व स्वतःपासूनच स्फूर्ति घेणारे प्राणी नव्हत. ते इतरांप्रमाणेंच सामाजिक मानव आहेत, व त्या दृष्टीने कोणत्या तरी विशिष्ट सामाजिक हितसंबंधांचे ते प्रतिनिधि असतात. मानव या नात्याने विविध प्रश्नांशीं त्यांचा संबंध येतो, तो केवळ वैयक्तिक स्वरूपाचा, त्यांच्याचपुरता मर्यादित, नसतो. प्रत्येक वैचारिक पिढींतील प्रभावी कवींची प्रभावळ तयार होत असते; त्यांच्यांत आपाततः कमी-अधिक भिन्नत्व असलें, तरी त्यांची विशिष्ट प्रभावळ असतेच, हें नाकारतां येणार नाही. त्यांच्यापुढील विविध समस्या एकाच प्रकारच्या असून आपापल्या परीने त्यांची मीमांसा ते करीत असतात. समकालीन हितसंबंधांतून उद्भवणाऱ्या कोणत्याहि प्रभावी संघर्षशक्तीबाहेर राहून प्रभावी कवि होणें कुणालाच शक्य नाही." (Modern Bengali Poetry, Marxist Miscellany, vol. V, P. 116, People's Publishing House, Bombay).

केशवसुत–महाजनी–पूर्व मराठी काव्याचें स्वरूप सांगतांना हाच दृष्टिकोन योजिलेला आहे, असें दिसून येईल. उपर्युक्त विवेचन म्हणजे टीका नसून वस्तुस्थितीचें सरळ जसेंच्या तसें कथन आहे. त्याचप्रमाणें, इंग्रज आले व आधुनिक मराठी गद्य व पद्य वाङ्मय निर्माण झालें, असें म्हणणें शुद्ध अविवेकाचें आहे. आता, आंग्लाई आली, तरीहि पूर्वीचाच जमाना कायम होता, असें मला म्हणावयाचें नाही; इंग्रजी अंमलाचे लगेच मोठाले परिणाम एतद्देशीयांच्या जीवनावर, आचार–विचारांवर व वाङ्मयावर घडूं लागले; परंतु हे परिणाम आगंतुक स्वरूपाचे होते, स्वाभाविक वाढींतून निष्पन्न होणारे नव्हते. श्री. देवीप्रसाद चट्टोपाध्याय यांचाच दाखला याहि बाबतींत मार्गदर्शक ठरेल. वर निर्देशिलेल्या आपल्या लेखांत ते पुढे म्हणतात—

"या सुमारास पाश्चिमात्य आदर्शांचा पगडा एतद्देशीय जीवनावर होऊं लागल्यामुळे एका नव्या संस्कृतीचा उदय होऊं घातला होता व तिच्याबरोबरच प्रस्थापित सरंजामदारी जमान्यांत आमूलाग्र बदल होऊं लागला. जुनाट व निकालांत निघालेल्या सरंजामशाहीची जागा एका नव्या सामर्थ्यशाली संस्कृतीने घेतली. परंतु हें खरें असलें, तरी, उदयोन्मुख मध्यवर्गीय (Bourgeois) भांडवलदारी 'संस्कृतीचें हिन्दुस्थानांत पाश्चिमात्य देशांतल्याहून वेगळें वैशिष्ट्य कांही बाबतींत होतें. हें वैशिष्ट्य महत्त्वाचें गणलें पाहिजे; कारण त्यांतच आधुनिक एतद्देशीय कवींच्या बदललेल्या दृष्टिकोनाचीं बीजें सापडतात. सूक्ष्म विचारान्तीं दिसून येईल की, हा बदलता जमाना म्हणजे जुन्या जमान्याची स्वाभाविक अशी प्रगत अवस्था नसून जुन्या जमान्यावर अकस्मात् बळजबरीने करण्यांत आलेलें तें कलम होतें! ज्या देशांतून या नव्या अवस्थेचें आगमन झालें, त्या देशांतच तिचें ऐतिहासिक अवतारकार्य संपून तिला कीड लागत चालली होती, कारण या भांडवलदारी अवस्थेचें युरोपांतल्या देशांत आक्रमक व प्रतिगामी साम्राज्यशाहींत याच वेळेस झपाट्याने रूपान्तर होऊं लागलें होतें. (उदयोन्मुख भांडवलदारी अवस्था ही सरंजामशाहीपेक्षा प्रगत असल्यामुळे सरंजामशाहीची ती शत्रु असते; सामाजिक, सांस्कृतिक, नैतिक व आर्थिक क्षेत्रांत ती नवीं मूल्यें स्थापन करते, व्यक्तिस्वातंत्र्याचा व त्याचबरोबर उदारमतवादित्वाचा व समाजसुधारणेचा ती पुरस्कार करते; पण तिच्या विकासाबरोबरच समाजसुधारणेच्या शस्त्राने ती आपणांला अनुकूल अशा पांढरपेशा वर्गाची निर्मिति करते व व्यक्तिस्वातंत्र्याचें कारखानदारी पिळणुकींत व पर्यायाने वसाहतींच्या आत्यंतिक गरजेसाठी साम्राज्यशाहींत रूपान्तर करते—श्री. अ.) या दोन्ही नव्या परस्परविरोधी वैशिष्ट्यांमुळे भारतीय वाङ्मयांत परस्परविरोधी समाजशक्तींच्या क्रियाप्रतिक्रियात्मक विचारसरणींची खिचडीच झाल्यासारखी दृष्टीस पडणें अपरिहार्य झालें! या नव्या वाङ्मयाची स्थिति नवख्या

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

वातावरणांत सोडून दिलेल्या क्षयरोगी बालका-प्रमाणे होती. तथापि क्षयरोगी असलें, तरी जुन्या-हून तें अधिक बरें असल्यामुळे त्याचीहि थोडीफार वाढ झालीच; अल्पावधींत कां होईना, त्याचें अवतारकार्य त्यानें केलें. त्याची वाढ संपूर्ण निरोगितेची निदर्शक नसली, तरी भांडवलदारी (बूर्ज्वा) समाज-व्यवस्थेचा तो घटक असल्या-मुळे सरंजामदारी अवस्थेशी सामना देण्याची कुवत त्याच्यांत होती." (सदर, पृष्ठ ११७.)

मराठी वाङ्मयांत वरील उद्‌गारांचें प्रत्यंतर चांगलेंच मिळतें. मुद्रणकलेच्या प्रसारामुळे वाङ्मयाला जोम आला व बाळशास्त्री जांभेकर, भाऊ महाजन-वगैरे लेखकांनी त्याचा योग्य उपयोग करून घेतला. 'लोकहितवादी'चीं 'शतपत्रें'या दृष्टीने फार महत्त्वाचीं आहेत. जुन्या सरंजामदारी अवस्थेचे बुरूज ढासळविण्याचें कार्यच त्यांनी मोठ्या प्रमाणावर केलें आहे. 'आता शूद्रांमधून धर्मवीर निर्माण होतील'–या लोकहितवादींच्या उद्‌गारांत नव्या युगांतील कनिष्ठ वर्गाच्या मात-बरीचेंच आवाहन केलें आहे. 'शतपत्रां'नीं नव्या जमान्याची जोरदार तरफदारी केली. तथापि, क्षयरोगी बालकाचीं इतर चिन्हेंहि त्यांत जागोजाग आढळास येतात. याच सुमारास विधवाविवाह, केशवपननिषेध, बालविवाहनिषेध, परदेशगमनस्वातंत्र्य, उपासनेंत सुधारणा, पतितपरावर्तन, जातिभेदनिषेध-वगैरे चळवळी फोफावत चालल्या, त्याचें कारण भांडवलदारी अवस्थेंतील व्यक्तिस्वातंत्र्यवाद निरनिराळीं स्वरूपें धारण करीत होता व उदारमतवादाचा (Humanitarianism) उदय होत होता, हेंच होय. मराठी वाङ्मयाच्या प्रत्येक क्षेत्रांत या चळवळींचें प्रतिबिंब उमटलेलें दिसेल. काव्य त्याला अपवाद राहणें शक्य नव्हतें. महाजनी-प्रभृतींनी इंग्रजी कवींच्या काव्यांचीं सरळ भाषान्तरें पुढें आणायला सुरवात केली. कवींपुढील बदलत्या आदर्शांची ही पूर्व-तयारीच होती म्हणाना! नाहीपक्षीं सरंजामदारी दृष्टिकोनांतून जुन्या इतिहासाला वेठीस धरून, स्फूर्ति शोधणारे 'राजा शिवाजी' कर्ते कुंटे-प्रभृति मोजके कवि तेवढे या गोष्टीस अपवाद सापडतील. तथापि, त्यांच्याहि लेखनपद्धतींत, मार्गेत, शैलींत व विचारांत अल्पा-धिक भिन्नता दिसून आल्याखेरीज राहिली नाही. 'रसतरंगिणी'कार कै. सी. वा. पेंडसे यांनी नव्या आंग्लस्फूर्त कवींचें वैशिष्ट्य पुढील शब्दांत सांगितलें आहे. त्यांत ऐतिहासिक परीक्षणदृष्टीचा अभाव असला, तरी स्थूलदृष्ट्या नव्या कवींचें बाह्यतः वैशिष्ट्य कोणतें होतें, तें सांगण्याचा लेखकाने प्रयत्न केला आहे:—

"पाश्चिमात्य सुधारणांचा व विचारांचा जसा हिंदुस्थानांत इतर सर्व गोष्टींवर थोडाबहुत परिणाम झाला, तसाच, किंबहुना, त्यापेक्षाहि वाङ्मयावर विशेष महत्त्वाचा परिणाम झाला. आंग्लसाहि-त्याच्या अध्ययनानें विचारास एक प्रकारचें नवीन वळण लागलें आणि या विचार क्रांति-मुळेच अलीकडील काव्याचे विषय व स्वरूपहि प्राचीन काव्याहून अगदी निराळीं झालीं...... ......[जुन्या कवींनी] ज्या विषयांकडे जवळ-जवळ दुर्लक्ष्य केलें, असे मानवी मनोवृत्ति उत्ते-जित करून सोडणारे, मनाला खळबळून टाकणारे, चमत्कृति उत्पन्न करून मनोरंजन करणारे, असे विषय अर्वाचीन कवींनी हातीं घेतले. सृष्टीचें चम-त्कृतिमय अनेकविध स्वरूप; निसर्गातील भव्य, रमणीय, शान्त, गंभीर असे देखावे; एकंदर सृष्ट-पदार्थांत दृग्गोचर होणारें ईश्वराचें सर्वव्यापी अस्तित्व; पशु, पक्षी, वनस्पति–इत्यादिकांचें सहृदयतापूर्वक निरीक्षण; मानवांवर कोसळणारे अनेक प्रकारचे सुखदुःखाचे प्रसंग......... अशा प्रकारच्या गोष्टी या काव्यांत बऱ्याच विशिष्ट अर्थानें आढळूं लागल्या आहेत........." ('रसतरंगिणी,' प्रस्तावना, पृ० ४, ६).

याखेरीज समाजसुधारणा, जातिभेदनिषेध, बंधुभाव, स्त्रीशिक्षण—वगैरे गोष्टींचें आधुनिक काव्यांतलें स्थान 'रसतरंगिणी'कारांनी प्रस्तावनेंत 'मानवांवर कोसळणारे अनेक प्रकारचे सुखदुःखाचे प्रसंग'—या मोघम वाक्यखंडांत अभिप्रेत ठेवलें आहे म्हणावें लागेल. हा नव्या विचारांचा लोंढा वेगवान् होता; जुन्यावर त्याने मात केली!

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

पण आंग्ल काव्यांतील जे आदर्श आधुनिक मराठी कवींनी गिरवले, ते विविध व भिन्नभिन्न काळांतले होते, त्यांचें युरोप खंडांतलें अवतारकार्य संपून त्या खंडांत साम्राज्यशाही अर्थव्यवस्थेचे आघात समाजाला बसत होते; त्या आघातांकडे व आंदोलनांकडे भारतीय कवींचें लक्ष्य गेलें नाही. ओवेनप्रभृतींच्या नेतृत्वाखालील चार्टिस्ट कामगारांची व ट्रेड यूनियनची चळवळ भडकून किंचित्काल अमानुष दडपशाहीमुळे विराम पावली होती, पण तिच्याच विनाशांतून सुधारणावाद सोडून क्रांतिकारक मार्गाकडे वळलेली नवी कामगार चळवळ उदयास आली होती. विशेषत: भांडवलदारी अर्थव्यवस्थेच्या बाबतींत इंग्लंड हें सर्व जगांत जास्त पुढे होतें व तिथेच नव्या कामगार चळवळींचे हादरे मोठ्या प्रमाणांत सर्वांच्या अगोदर बसत होते ! या गोष्टी इंग्रजी अंमलाखालील भारतीयांच्या नोकरपेशाच्या शिक्षणांत येणें शक्य नव्हतें. युरोपांत जुने झालेले, ओसरलेले, परंतु एतद्देशीय सरंजामदारी संस्कृतीहून अधिक सामर्थ्यशाली असे भिन्नभिन्न विचारसंप्रदाय व कविपरंपरा हीं आधुनिक मराठी कवींच्यापुढे आदर्श म्हणून होतीं. देविप्रसाद चट्टोपाध्याय यांच्याच शब्दांत या गुंतागुंतीच्या वस्तुस्थितीचें वर्णन देतां येईल. ते म्हणतात:—

"(नव्या उदयोन्मुख जमान्यांतील अंतर्गत घोटाळ्याचें) वर्णन पुढीलप्रमाणे करतां येईल. पाश्चिमात्य भांडवलदारी समाजव्यवस्थेपुढे हे दोन प्रश्न उभे होते. एक तर, हिंदुस्थानांत आपणाला अनुकूल (सरंजामशाही विरोधी) अशी नवी संस्कृति त्यांना पसरवायची होती, कारण त्यावाचून बाजारपेठी वसाहत म्हणून हिंदुस्थानचा त्यांना उपयोग होणें अशक्य होतें; दुसरें, हिंदुस्थानांत या सुधारणेबरोबर ओघानेच आवश्यक असलेलें औद्योगीकरण त्यांना नको होतें, कारण त्यायोगें हिंदी भांडवलदारांशीं त्यांना स्पर्धा करावी लागली असती. (म्हणजे औद्योगीकरणावाचून भांडवलदारी समाजव्यवस्थेची परिस्थिति निर्माण करण्यासाठी सुधारणेचें कलम त्यांना हिंदुस्थानांत लावायचें होतें.) हिंदी भांडवलदार(बूर्झ्वा)वर्गापुढे देखील असेच दोन प्रश्न 'आ' वासून उभे होते. सरंजामशाहीचे आधारस्तंभ असलेले सरदार-दरकदार, धर्मकारणाचे मक्तेदार वर्ण, व त्यांनी कायम ठेवलेली जुनी बुरसलेली सामाजिक घडी यांच्याशीं टक्कर देण्यासाठी पाश्चिमात्य भांडवलदारी विजेत्यांशीं त्यांना दोस्ती करणें आवश्यक होतें, तर दुसरीकडे आपली उदयास आलेली सद्दी वाढवण्यासाठी व टिकवण्यासाठी औद्योगिक कामगार व इतर श्रमजीवि जनतेच्या प्रगतिपर शक्तींना मागे खेचायचें होतें. आश्चर्य असें की, एवढ्यावरच त्यांचें भागण्यासारखें नव्हतें. एका हाताने ज्यांच्याशी ते दोस्ती करूं पाहात होते, त्या पाश्चिमात्य भांडवलदारांशीं स्वतःच्या आर्थिक मिरासदारीसाठी त्यांना दुसऱ्या हाताने लढायचें होतें; यासाठीच दुसरा शत्रु जो वर्धिष्णु श्रमजीवि-वर्ग त्याच्याशीं मागच्या दाराने दोस्ती करणेंहि आवश्यकच होतें! या परस्परविसंगत अपरिहार्यतेचे झालेले आर्थिक व राजकीय परिणाम सर्वविश्रुत आहेत. **या संमिश्र हितसंबंधांचें वाङ्मयांत प्रतिबिंब कसें पडलें, हाच प्रस्तुतचा मुद्दा आहे.** एतद्देशीय वर्धिष्णु भांडवलदारी मनोवृत्तीच्या वर्गांत या विविध प्रवृत्तींचे विलक्षण उलटसुलट मानसिक व बौद्धिक संघर्ष चालले होते. एका परीने, पाश्चिमात्य म्हणून जें जें कांही असेल, त्या सर्वांचा 'उदोउदो' केला जात होता, त्यांत अद्भुतरम्यतेवर आधारलेला स्वप्नसुखवाद, दुराग्रही केवलवाद, सयुक्तिकतावाद, उपयुक्ततावाद, रूसोचा वैयक्तिक कैवल्यवाद, हेगेलचा कट्टर अनियंत्रणावाद, त्याचप्रमाणें, सरंजामशाहींतील अज्ञान व भोळसटपणाविरुद्ध लढा व सुधारणेचा पुरस्कार या सर्व गोष्टींची त्यांत खिचडी झालेली आढळते, तर दुसऱ्यापरीनें, बद्धमूल झालेली राष्ट्रीय भावना, गीतोपनिषदादि ग्रंथांबद्दलचा आदरभाव, धार्मिक भावना, श्रमिक व गरिबांविषयीं सहानुभूति, जुन्या ऐतिहासिक घराण्यांतील (सरंजामदारी) व्यक्तींबद्दल अभिमान, प्राचीन संस्कृतीचा अभिमान,-इत्यादि अनेक गोष्टी अजूनहि जोर करीत होत्या.' [सदर पृष्ठ ११७-११८.] (विष्णुबुवा ब्रह्मचारी, कै. कुंटे,

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

शास्त्री-पंडितांची प्रभावळ, ह. ना. आपटे, फुले, कीर्तनें, पितापुत्र शास्त्रीबुवा, न्या. रानडे, टिळक-वगैरे व्यक्तींचें वाङ्मय नीट अभ्यासिलें असतां या म्हणण्याची सत्यता पटेल.)

पाश्चिमात्य भांडवलशाहीचें साम्राज्यशाहींत पर्यवसान झपाट्यानें झाल्यामुळे हिंदुस्थानसारख्या देशाची स्थिति प्रकटपणें वसाहतीच्या दर्ज्याची झाली होती. त्यामुळे ' वसाहत देशांतील उदयोन्मुख भांडवलदारी (बूर्ज्वा) विचारप्रणालीचे प्रातिनिधिक ' असें केशवसुतांच्या आगेमागे झालेल्या निकटच्या कवींच्या प्रभावळीचें वर्णन केल्यास योग्य होईल.

" कवीची स्फूर्ति म्हणजे त्याच्यांतील अलौकिक चेतनाशक्तीचें स्पंदन असून तीच त्याच्यांतील एका अदृश्य, अगम्य सृष्टीची दूतिका आहे. जीवनशक्तीशी कवीचा स्पर्श म्हणजेच स्फूर्ति. हा स्पर्श धन व ऋण विद्युतांच्या मीलनाप्रमाणें असून त्यांतून दिव्यदृष्टीचा प्रकाश फाकूं लागतांच कविमानसांतील गोष्टींना सुंदरतेचें स्वरूप प्राप्त होतें " (Inspiration is the breathing-in of power from the higher force-centres of life. The poet is the messenger of the invisible. The moment of his contact with the life-current is inspiration. This touch is as the union of electricity, positive and negative. It is the birth of the light of vision which transmutes all things into beauty "–The Poetry of the Invisible by Syed Mehdi Imam)— हे उद्गार किती भ्रममूलक आहेत, व कवि हा आगापीछा नसलेला जगावेगळा प्राणी नसून समाजरचनेच्या विशिष्ट विभागाचा व विशिष्ट कालखंडाचा प्रातिनिधिक उद्गाता तो कसा असतो, हें केशवसुतांच्या उदाहरणावरून आपणांला दिसून येईल. केशवसुतांना टीकाकारांनी युगप्रवर्तक, बंडखोर, क्रांतिकारक, त्याचप्रमाणें, रडवे, स्त्रैण, रांगडे-वगैरे विशेषणांनी संबोधिलेलें आहे; तथापि, त्यांना या विशेषणांच्या मर्यादा कळलेल्या दिसत नाहीत. केशवसुतांचा काळ म्हणजे एक नवा काळ कसा होता, त्याची सामाजिक व आर्थिक मूल्यें कोणतीं, त्या काळीं वेगवेगळ्या संमिश्र पाश्चिमात्य व एतद्देशीय विचारप्रवाहांचा एकदमच आपल्या समाजावर परिणाम कसा होत होता, हें आपण पाहिलें. अशा बदलत्या काळांतील केशवसुतांचें स्थान कोणतें ?–कवि बोलतो व मग जग बदलतें-असा आजवरचा इतिहास नसून, जमाना बदलतो व एखादा प्रभावी कवि त्याच्या आकांक्षा यथार्थतेनें व्यक्त करतो, व म्हणून त्याला महत्त्व प्राप्त होतें, हेंच म्हणणें सयुक्तिक आहे. थोडक्यांत सांगायचें झाल्यास केशवसुत हे बदलत्या जमान्याचे प्रतिनिधि होते, ते युगप्रतिनिधि होते, त्यांचें युग नव्यानें जन्मास येऊन विकास पावत होतें, म्हणून जुन्या जमान्याशी टक्कर देणाऱ्या वर्गाचे इतरांबरोबर तेहि उद्गाते बनले. म्हणून त्यांना तारतम्यानें बंडखोर वा युगप्रवर्तक म्हणायचें. परंतु अत्याधिक व्याप्तीचा दोष टाळून त्यांचें समर्पक वर्णन करायचें झाल्यास ' युगप्रतिनिधि ' या शब्दांतच तें करावें लागेल.

• • •

' फुलांची ओंजळ ' प्रसिद्ध झाली आहे.

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

वाङ्मयाचें मूल्यमापन

लेखांक ४ था

प्राध्यापक अच्युत नारायण देशपांडे
एम्. ए.

● या लेखमालेचा तिसरा हप्ता 'युगवाणी'च्या जुलैच्या अंकांत आलेला आहे. या लेखांकांत वाङ्मयाचें आद्य प्रयोजन यथार्थ आत्माविष्कार हें असून खरा जातिवंत साहित्यकार त्यासाठीच धडपडत असतो, असा सिद्धान्त मांडलेला आहे. आपला हा 'आविष्कारवाद' पाश्चिमात्यांच्या 'Expressionism'चें आंधळें अनुकरण नसून बहुतांशीं मौलिक आहे, असें प्रा. देशपांडे सांगतात. हें कसें, तें पुढील लेखांकावरून स्पष्ट होण्याची ग्वाही ते देतात.

* * *

४

जीर्ण प्रवृत्तींचा परामर्ष : आविष्कारवादाचें उद्‌घाटन

वाङ्मयाचें प्रयोजन काय असावें, हा साहित्य-शास्त्रांतला अत्यंत महत्त्वाचा प्रश्न आहे; कारण, या प्रश्नाच्या उत्तरावरूनच विशिष्ट साहित्य-काराची किंवा साहित्यशास्त्रज्ञाची वाङ्मयविषयक भूमिका काय आहे, हें निश्चित ओळखतां येतें. एखादा कवि वा लेखक जेव्हा एखादें काव्य वा एखादी वाङ्मयीन कृति निर्माण करतो, तेव्हा तो ती निर्मिती का करतो, प्राधान्यानें कोणत्या विशिष्ट उद्दिष्टाच्या परिपूर्तीच्या प्रेरणेनें तो ती निर्मिती करतो, हें शोधून काढणें आपली साहित्यशास्त्र-विषयक भूमिका सुस्पष्ट करण्याच्या दृष्टीनें अत्यंत आवश्यक असतें. म्हणूनच या लेखांकांत या वाङ्मयाच्या प्रयोजनासंबंधींचा माझा दृष्टिकोन विशद करण्याचें मीं योजिलें आहे.

वाङ्मयाच्या प्रयोजनासंबंधींचा हा प्रश्न फार फार जुना आहे; जवळजवळ अडीच हजार वर्षांची प्रदीर्घ परंपरा त्याला लाभलेली आहे. या अडीच हजार वर्षांच्या काळांत होऊन गेलेल्या साऱ्या थोर साहित्यकारांनी आणि साहित्यशास्त्र्यांनी या प्रश्नां-संबंधींचें आपापलें निश्चित मत व्यक्त केलेलें आहे. या मतांचें ऐतिहासिक दृष्ट्या स्थूल समालोचन करणें, मला जें मत मांडावयाचें आहे त्याचें वैशिष्ट्य स्पष्ट करण्याच्या दृष्टीनें, अत्यंत आवश्यक आहे; म्हणून प्रथम प्राचीनांच्या वाङ्मयप्रयोजनविषयक मत-मतांतराची ओळख करून घेऊं.

आनंदवाद आणि बोधवाद हीं वाङ्मयाचीं अगदी परस्परविरोधी असलेलीं अशीं दोन ठळक व मान्य उद्दिष्टें होत. अगदी होमरच्या वेळेपासून या विभिन्न उद्दिष्टांचा पुरस्कार झालेला आढळतो. विशिष्ट प्रकारची मोहनी निर्माण करून आनंद देणें हें काव्याचें कार्य आहे, असें होमर म्हणत असे, तर लोकांना कांहीं तरी दिव्य संदेश देणें हें काव्याचें उद्दिष्ट होय, असें हेसिऑड सांगत असे. होमर–हेसिऑडनंतर या प्रश्नाची स्पष्ट चर्चा खि. पू. ५ व्या शतकांत होऊन गेलेल्या प्रसिद्ध विडंबन-कार अरिस्टॉफेन्सने आपल्या विनोदिकांत केलेली आढळते. त्या दृष्टीनें त्याची 'Frogs' ही विनोदिका अत्यंत महत्त्वाची आहे. या विनोदिकेंत सनातनी वृत्तीच्या व 'जुनें तें सोनें' म्हणणाऱ्या अरिस्टॉफेन्सने ॲचिलिस व युरिपिडिज या दोन नाटककारांची तुलना करून नाट्यवाङ्मयांत नव-नवीन सुधारणा घडवून आणणाऱ्या युरिपिडिजची चेष्टा केली आहे. या दोघांच्या संवादांत काव्याचें कार्य प्राधान्यानें उद्‌बोधनाचेंच असतें, ही तत्का-लीन ग्रीकांची समजूत अरिस्टॉफेन्सने व्यक्त केली आहे. ॲचिलिसच्या तोंडीं घातलेल्या—

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

Children and boys have
a teacher assigned them—
The bard is a master
for manhood and youth,
Bound to instruct them
in virtue and truth,
Beholden and bound.

या उद्‌गारांत ही समजूत अगदी निरसंदिग्ध स्वरूपांत मांडलेली आढळते. याच विनोदिकेंत असा एक प्रसंग आहे की, ज्यावेळीं युरिपिडिजला

Tell me then what are
the principal merits
Entitling a poet to
praise and renown?

असा प्रश्न विचारण्यांत येतो, त्यावेळीं तो उत्तर देतो :

The improvement of morals,
the progress of mind,
When a poet by
skill and invention
Can render his audience
virtuous and wise.

या उत्तरांतहि उघड उघडच काव्याच्या बोधदानाच्या प्रयोजनावरच सर्व भर दिलेला आढळून येतो.

प्लेटोचीहि काव्याच्या उद्दिष्टासंबंधींची भूमिका पूर्णपणें बोधवादाला अनुकूल आहे. 'Gorgias', 'Republic', 'Laws' आणि 'Phaedrus' या त्याच्या संवादग्रंथांत केवळ करमणूक हें काव्याचें उद्दिष्ट त्याला मुळीच मान्य नसल्याचें त्यानें स्पष्टपणें सांगितलें आहे. केवळ करमणुकीकरिता काव्य करणाऱ्या कवीची योग्यता तो रोटीवाल्याइतकीच समजतो! काव्यामध्ये अगदीं स्वाभाविक स्वरूपाचें सौंदर्यजन्य आकर्षण आहे, हें तो मान्य करतो. पण त्या आकर्षणाचा आविष्कार करणें एवढेंच मर्यादित स्वरूपाचें कवीचें कार्य असतें, या विचाराचा मात्र तो स्पष्ट निषेध करतो. मानवी स्वभावाला योग्य वळण लावणें, मानवी अंतःकरणांतील आदर्श जीवनाला पोषक असलेल्या सुप्त शक्तींना जागृत करून त्यांचा विकास घडवून आणणें आणि अशा रीतीने लोकांना आदर्श जीवन जगायला लावून आदर्श जग निर्माण करण्यास मदत करणें, हें काव्याचें उद्दिष्ट असावें, असें तो म्हणतो; म्हणूनच त्यानें काव्याचा जो कांही थोडासा पुरस्कार केला आहे, तो अशा सोवळ्या, साध्या व संयमशील काव्याचाच केला आहे, असें आढळून येतें.

अरिस्टॉटलने आपल्या 'Poetics' मध्यें काव्याच्या उद्दिष्टासंबंधीं ठाम विधान कोठेहि केलेलें आढळत नाही, हें खरें असलें, तरी पण तो प्रामुख्यानें आनंदवादीच असला पाहिजे, असें त्याच्या एकंदर विवेचनावरून वाटतें. 'Poetics' व 'Metaphysics' मध्ये त्याने संगीताच्या कार्यासंबंधीं जें विवेचन केलें आहे, त्यावरून सुसंस्कृत स्वरूपाच्या व सौंदर्यजन्य आनंदाची प्राप्ति करून देणें हें काव्याचें उद्दिष्ट त्याला मान्य असलें पाहिजे, असें दिसतें. अर्थात् हें सौंदर्यनिर्मित आनंददान नीतीला व सद्‌भावनांना बाधक नसावें, असेंहि त्यानें सूचित केलें आहे. 'Poetics'चा प्रसिद्ध टीकाकार एस्. एच्. बुचर यानें सुद्धा असाच निष्कर्ष काढला आहे. रसिकान्तःकरणांवर सुखद संवेदनांचा संस्कार करण्याचें कार्य कवी करतात, असें अरिस्टॉटलचें मत असल्याचें तो सांगतो. तो लिहितो : "The end, then, of fine art, according to Aristotle is a certain pleasurable impression produced upon the mind of the hearer or the spectator."

काव्यापासून भावनानिष्ठ स्वरूपाच्या आनंदाचा लाभ तर होतोच; पण त्याबरोबरच त्याच्यापासून जिज्ञासापूर्तीचाहि आनंद मिळतो, असेंहि अरिस्टॉटलचें मत होतें; कारण तो काव्यनिर्मितीच्या प्रक्रियेच्या बाबतींत अनुकृतीच्या सिद्धान्ताला उचलून धरणारा होता. त्याच्या Poetics मधील त्याचीं

(i) "Epic poetry, tragedy, comedy, dithyrambics, as also, for

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

the most part, the music of the flute and of the lyre-all these are, in the most general view of them, imitations. "

(ii) " All men likewise naturally receive pleasure from imitation. "

(iii) " To learn is a natural pleasure, not confined to philosophers, but common to all men."
—हीं तीन विधानें एकत्र वाचलीं, म्हणजे तो काव्यापासून मिळणाऱ्या जिज्ञासापूर्तिजन्य बुद्धिनिष्ठ आनंदाचाहि पुरस्कर्ता होता, हें सहजच सिद्ध होतें.

लाँगिनसने वाङ्मयाच्या उद्दिष्टासंबंधीं जी भूमिका मांडली आहे, तींत आनंदवादाचें अत्यंत विकसित, व्यापक आणि उदात्त स्वरूप व्यक्त झालेलें आढळून येतें. उत्कृष्ट काव्यकृतीच्या वाचनानें रसिकाच्या अंतःकरणाला एक प्रकारची उन्मनी अवस्था प्राप्त होते, त्या काव्यांतील सामर्थ्याचा आणि सौंदर्याचा त्याच्या मनावर असा विलक्षण आणि अनिवार्य प्रभाव पडतो की, तो आपल्या वेगळेपणाची जाणीव विसरून जातो, असें मत त्यानें मांडलें आहे. तो म्हणतोः " For a work of genius does not aim at persuasion, but ecstasy-or lifting the reader out of himself."

होरेसचा वाङ्मयाच्या प्रयोजनाबाबतचा दृष्टिकोन तर प्रसिद्धच आहे. त्यानें आनंदवाद व बोधवाद या दोन्ही भूमिकांचा समन्वय साधण्याचा प्रयत्न केला आहे. तो आपल्या ' Epistle to the pisos ' या पत्रबद्ध ग्रंथांत लिहितोः " Poets wish either to instruct or to delight or to combine the two. "

लाँगिनस आणि होरेस या दोघांच्याहि भूमिकांचें ज्यांत सम्मीलन झालें आहे, असा समन्वयवादी दृष्टिकोन सोळाव्या शतकांतल्या मिंटुर्नो (Minturno) या इटालियन टीकाकारानें व्यक्त केलेला आढळतो. तो म्हणतोः " It will be the business of the poet so to speak in his verses that he may teach, that he may delight, that he may move. "

काव्याचें प्रधान व एकमेव उद्दिष्ट बोधदानाचेंच; पण बोधवादाला मनोरंजक स्वरूप द्यायचें तें केवळ नुसता बोध कंटाळवाणा वाटूं नये म्हणून, असें म्हणणारे व आत्यंतिक बोधवादाचे पुरस्कार करणारेहि पुष्कळ साहित्यविवेचक आढळतात. १७ व्या शतकांतला फ्रेंच टीकाकार रॅपिन (Rapin) हा अशांपैकीच होय. तो म्हणतोः " It is only for the purpose of being useful that Poetry ought to be agreeable; pleasure is only a means which she uses for the end of profit. "

अशा रीतीनें आनंदवाद व बोधवाद या वाङ्मयाच्या द्विविध उद्दिष्टांपैकीं कोणत्या तरी एकाचा किंवा दोघांच्याहि समन्वयाचा निरनिराळ्या काळांतील साहित्यविवेचकांनी पाठपुरावा केलेला आढळतो. आजसुद्धा हे साहित्यशास्त्रांतर्गत दोन वाद निरनिराळ्या नांवांखाली अस्तित्वांत आहेत. ' कलेकरिता कला ' असें म्हणणारा जो एक पक्ष आहे, त्यांतील कांहीं विवेचक काव्यांतील प्रतिपाद्य विषयाच्या यथार्थ आणि प्रभावी अभिव्यक्तीच्या प्रयोजनाला मुळींच प्राधान्य न देतां रसिकान्तःकरणाला संतोष देण्याच्या प्रयोजनावरच जास्त भर देतांना आढळून येतात. अर्थातच हा विवेचकवर्ग आनंदवादी पंथांतलाच होय. बोधवादाला तर आजच्या काळीं मोठें भरदार आणि भारदस्त स्वरूप प्राप्त झालें आहे; कारण सोव्हिएट रशियासारख्या प्रबळ आणि समर्थ शक्तीनें तिचा पुरस्कार केलेला आहे. मार्क्स-एंजल्स-लेनिन यांच्या वाङ्मय-कलाविषयक मतांची स्वाभाविक परिणति आज सोव्हिएट रशियांत ' साम्यवादी यथार्थवाद ' [Socialist realism] या संज्ञेनें संबोधिल्या जाणाऱ्या विचारविशेषांत झालेली आहे. ' साम्यवादी यथार्थवादा 'च्या चौकटींत बसेल एवढेंच व असेंच

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

वाङ्मय सोव्हिएट लेखकांनी निर्माण केलें पाहिजे, असा आज रशियांत डॅनोव्हसारख्या लेखक-वर्गाच्या प्रधान अधिकाऱ्याकडून अत्यंत आग्रही स्वरूपाचा प्रचार करण्यांत येत आहे! वाङ्मयांतील 'साम्यवादी यथार्थ'वादाच्या प्रकटीकरणाचा हा अट्टाहास म्हणजे आत्यंतिक व एककल्ली स्वरूपाच्या बोधवादाचाच पुरस्कार नव्हे काय?

आपल्याकडील संस्कृत साहित्यशास्त्रामध्येहि वाङ्मयाच्या प्रयोजनांसंबंधीं निरनिराळीं मतें व्यक्त केलेलीं आढळतात. 'काव्यप्रकाशां'तल्या पहिल्या उल्लासांतल्या

काव्यं यशसे, अर्थकृते, व्यवहारविदे, शिवेत—
रक्षतये सद्यःपरनिर्वृत्तये, कन्तासंमितयोपदेशयुजे।

या कारिकेंत आणि 'काव्यालंकारां'तल्या

धर्मार्थकाममोक्षेषु वैचक्षण्यं कलासुच
प्रीतिं करोति कीर्तिंच साधुकाव्यनिबन्धनम्।

या श्लोकांत त्यांपैकी बहुतेक सर्व महत्त्वाचीं मतें आलीं आहेत, असें दिसून येतें. वरील कारिकेंत व श्लोकांत कवि कोणत्या विशिष्ट लौकिक उद्देशाने प्रेरित होऊन काव्य करतो, याचाच प्रामुख्याने उल्लेख केला आहे. यशप्राप्ति, अर्थप्राप्ति; व्यवहार-ज्ञानलाभ, अशुभनिवारण, चतुर्विध पुरुषार्थलाभ व प्रितिप्राप्ति--यांपैकी कोणत्यातरी एका वा अनेक स्वार्थी व लौकिक उद्दिष्टांच्या परिपूर्तीकरिता कवि काव्यरचना करतो, असें यांत सांगितलें आहे. त्याशिवाय, 'सद्यःपरनिर्वृत्तये' यांत आनंदवादाचा आणि 'कांतासंमिततयोपदेशयुजे' यांत बोधवादाचा पुरस्कार केलेला दिसून येतो. या साऱ्या प्रयोजनांत 'सकलप्रयोजनमौलिभूत' असलेल्या 'सद्यःपरि-निर्वृत्तये'लाच संस्कृत साहित्यकारांनी व साहित्यशास्त्रज्ञांनी अग्रपूजेचा मान दिलेला आढळून येतो. त्यामुळे ते काव्यप्रयो-जनाच्या बाबतींत प्राधान्याने आनंदवादाचे पक्ष-पाती होते, असें म्हटलें, तर अवास्तव होणार नाही, असें वाटतें.

आपल्या मराठींतील प्राचीन कविश्रेष्ठांची काव्याच्या प्रयोजनाबाबत काय भूमिका होती, याचें सुंदर समालोचन डॉ. मा. गो. देशमुख यांनी आपल्या 'मराठीचें साहित्यशास्त्र' या प्रबंधांतील 'काव्यप्रयोजन' या पांचव्या उल्लेखांत केलेलं आहे. त्या कवींचा काव्यप्रयोजनाबाबतचा दृष्टिकोन समजावून देण्याच्या दृष्टीने त्या समालोचनांत उद्धृत केलेलीं निरनिराळ्या कवींचीं वचनें अत्यंत उद्बोधक आहेत. त्यांतील सर्व प्रयोजनांचें संकलन करण्याच्या दृष्टीने आवश्यक आहेत तेवढींच वचनें येथे देतोः

१. प्रियां गीत येणें नांवें। तूझें यश हें अमृत तुहावें
वाउं लागलेति तें दूर्गेनि यावें। देंवल दैव॥
माझिया सत्यवाचा तप। केलें बहुत कल्प
तेया फलांचें हें महाकोंप। पातली प्रभू॥
पुण्यें पोसिलीं असाधारणें। तिथें तुझे गुण वाचणें।
देउनि मज उरिणें। जालिं आजि॥
—ज्ञानेश्वर-'ज्ञानेश्वरी' १६: ३१ ते ३३

२ रोसें प्रेम दूणावटे। पढियंतेयाचेनि।
म्हणौनि मज लेंकुरवाचेनि बोलें। तुमचें
कृपालुपण निदैलें।
चेईलें हें जी जाणवलें। एयालागि बोलिलां॥
परि ऐसा ही मज विंवसा। तो पुडुतीं एयाचि
एकी आशा
जें धीटीवं करुनि भवादृशां। पढियंतेआं होआवें॥
—ज्ञानेश्वर-'ज्ञानेश्वरी'

३ तैसें न करिता गुणकथन। वाचेशीं नाही पवित्रपण।
न स्मरतां श्रीचरण। जीव शुद्ध नव्हे॥
म्हणौनि भलतयापरी। मूढीं अथवा सातारीं।
स्तवावा श्रीमुरारी। गुणनिधान॥
—विश्वनाथ पंडित-'ज्ञानप्रबोध'

४ तैसा वाग्विलासु विस्तारुं। गीतार्था विश्वभरुं
आनंदाचें आवारुं। मांडूं जगा॥
तरि अवधान एकलें देइजे। मग सर्व सुखासि
पात्र होइजे॥
तैसे अध्यात्मशास्त्रीं इथे। अंतरंगचि अधिकारिये
येरि लोक वाक्चातुर्यें। होईल सुखिया
—ज्ञानेश्वर 'ज्ञानेश्वरी'

५. जितुकें कांही आपणास ठावें। तितुकें हळुहळु
सिकवावें।
शाहाणें करून सोडावे। बहुतजन॥
—रामदास

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

पिढूं भक्तीचा डांगोरा । कळिकाळासी दरारा ।
तुका म्हणे करा । जयजयकार आनंद ॥
—तुकाराम

६. उपमाश्लेषवर्णुकः एहीं रंजउं सकळैकुं लोक ?
की पवाडे संसारमोचकः वाणौ मुकुंदाचे ?
—दामोदरपंडित

उपरोक्त सहा वचनांपैकी पहिल्या तिहींमध्ये अनुक्रमें (१) ईशयशोगान, (२) संतप्रेमसंपादन व (३) वाणीचें पवित्रीकरण हीं तीन 'आत्मनेपदी' म्हणजे 'व्यक्तिनिष्ठ' प्रयोजनें मांडलेलीं आहेत. चवथ्या व पाचव्या वचनांत प्रतिपादिलेलीं (४) रसिकजनसंतोष व (५) ज्ञानाचा व भक्तीचा प्रचार—हीं दोन प्रयोजनें प्राधान्यानें 'परस्मैपदी' म्हणजे 'रसिकसापेक्ष' आहेत. दामोदरपंडिताच्या शेवटच्या (६) व्या वचनांत आत्मोद्धार आणि रसिकरंजन या दोन प्रयोजनांचा समन्वय करण्यांत आला आहे. परस्मैपदी भूमिकेवरून आनंददानाच्या व बोधवादाच्या दृष्टीनें विचार केला, तर वरील सहा प्रयोजनांपैकीं रसिकजनसंतोष आणि ज्ञानाचा व भक्तीचा प्रचार हीं अनुक्रमें आनंदवाद व बोधवाद यांचा पुरस्कार करणारीं प्रयोजनें ठरतात. बाकीचीं उरलेलीं ईशयशोगान, संतप्रेमसंपादन व वाणीचें पवित्रीकरण हीं प्रयोजनें आत्मनेपदी स्वरूपाचीं असलीं, तरी पण त्यांत दृष्टि सर्वस्वीं बोधाचीच आहे; फरक एवढाच कीं, यांतील बोधदानाची क्रिया परलक्षी असून आत्मलक्षी आहे; म्हणून हीं तिन्ही प्रयोजनें बोधवादाचीच तळी उचलणारीं आहेत, असेंच म्हटलें पाहिजे.

वाङ्मयाच्या प्रयोजनाच्या या प्रश्नाच्या बाबतींत आधुनिक मराठी साहित्यकारांच्या भूमिका तपासून पाहिल्या, तर त्यांत कांहीं बोधवाद व आनंदवाद यांपैकीं एकेकाचा हिरीरीनें पुरस्कार करणारे आढळतात, तर कांहीं या दोहोंच्याहि समुचित समन्वयाला उचलून धरीत असलेले दिसून येतात. (For arts' sake alone I would not face the toil of writing a single sentence) 'केवळ कलाविलासाकरितां एक ओळसुद्धा लिहिण्याचे कष्ट मी घेणार नाहीं'—असें म्हणणाऱ्या शॉप्रमाणे, वाङ्मयांत नीतिबोधाचा आग्रह धरणारे हरिभाऊ आपटे लिहितात: "आनंद उत्पन्न करणें हाच विदग्ध वाङ्मयाचा उद्देश–प्रधान उद्देश–होय असें धरावें लागतें; पण वास्तविक तसें नाहीं. कित्येक वाङ्मयमीमांसक विदग्ध वाङ्मयाचा प्रधान व एकमेव उद्देश आनंदोत्पादन हाच होय, त्याजपासून सत्याचा बोध किंवा नीतीचा बोध झाला पाहिजे, असें नाही, असें प्रतिपादन करतात; परंतु मला ती त्या मीमांसकांची मीमांसा मान्य नाहीं." याच्या उलट 'सर्व कला निर्हेतुक असते' [All art is useless] असें म्हणणाऱ्या ऑस्करवाईल्डइतकी अतिरेकी नसली, तरीपण "Art with a certain tendency is not genuine art and so I blame every Government which desires to use art for propaganda purposes. Art must display its own merits and nothing else"—असें म्हणणाऱ्या पिरँडेलोसारखी केवळ कलात्मक आनंदालाच प्राधान्य देणारी भूमिका प्रा. फडके यांनी मांडलेली आढळते. ते लिहितात: आनंद हाच ललितवाङ्मयाचा खरा हेतु...उलट, तत्त्वप्रतिपादन हा कथावाङ्मयाचा मुख्य हेतु होय, असें कोणाला प्रतिपादन करतां यावयाचें नाहीं." न. चिं. केळकरांचा आनंदवादाकडेच कल जास्त दिसत असला, तरी ते बोधवादाला अगदीच झिडकारून टाकीत नाहीत. "ज्याअर्थी वाङ्मय हें मनुष्याच्या सद्भावनांनाच अलंकारिक स्वरूप देण्यानें निर्माण होतें, त्याअर्थी नीतिबोध हा वाङ्मयाचा अप्रत्यक्ष परिणाम होऊं शकेल," असें म्हणून ते बोधवादाला आंजारतात-गोंजारतात; पण त्याचबरोबर "कलाविलासाच्या मागें हेतुसंशोधनाचा गुप्त पोलीस लावून दिला, तर अनर्थकारक परिणाम झाल्याशिवाय राहणार नाहीत"—अशी रास्त धमकी देऊन आपली आनंदवादावरील निष्ठा व्यक्त करायलाहि कचरत नाहीत. वा. म. जोशी यांच्याहि वाङ्मयप्रयोजनविषयक लिखाणांत अशाच तऱ्हेच्या समन्वयाच्या वृत्तीचा विलास आढळून येतो: "कला काय,

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

नीति काय किंवा सत्यप्रीति काय, पूर्ण स्वातंत्र्याच्या मोकळ्या हवेंतच फोफावते, फुलते आणि सुफलदायी होते "—असें लिहून ते निःसंदिग्धपणें कलेच्या स्वातंत्र्याला मान्यता देतात आणि पर्यायाने कलाकृतीचें रसग्रहण करतांना कलाविशिष्ट सौंदर्यजन्य आनंदच प्रधान मानला पाहिजे, असें स्पष्ट सुचवितात; पण त्याचबरोबर "असत्य, दुर्जनता व हरतऱ्हेची कुरूपता यांचा विनाश करणें व सत्य, सौजन्य आणि सौंदर्य यांचें संस्थापन करणें हें आपलें अवतारकृत्य आहे "—असा वाङ्मयसेवकांना, उघड उघड बोधवादालाच पोषक असलेला, संदेश देतात. माडखोलकरांची या बाबतींतील भूमिका जवळ जवळ न. चिं. केळकरांच्या भूमिकेशींच विशेष सदृश आहे. ते लिहितात: "विशुद्ध आनंद देणें हीच कलात्मक वाङ्मयाची खरी कसोटी आहे. त्याच्या परिशीलनाने बोध झाला, तर तो इष्ट आहे, पण अवश्य मात्र नाही. वस्तुतः विशुद्ध आनंद देणारें वाङ्मय बोध आपोआपच देतें....तथापि, बोध हें ललितवाङ्मयाचें सहजकार्य असलें, तरी अंतिम साध्य मात्र नव्हे."

आधुनिक मराठी कवींमध्ये ज्यांनी आपल्या कवितांत मोठ्या आग्रहाने आणि अभिनिवेशाने काव्यतत्त्वविचार मांडला आहे, अशा केशवसुत व Bee या कवींच्या वाङ्मयप्रयोजनविषयक दृष्टिकोनांचीहि ओळख करून घेणें आवश्यक आहे. केशवसुतांच्या 'कवितेचें प्रयोजन' या कवितेंतील

आलेल्या दुरवस्थितींतुनि
तुम्ही उत्तीर्ण व्हाया जरी
उद्योगीं रत व्हावया
धरितसा औत्सुक्य चित्तीं तरी
गाण्याने कविच्या
प्रभाव तुमचा वर्धिष्णुता घेइल
स्फूर्तीचा तुमच्या पिढ्यांस
पुढल्या साक्षी कवी होइल ॥
आशा, प्रेम, तसेंच, वीर्य
कवनीं तो आपल्या गाइल
गेलें वैभव गाउनी
स्फुरण तो युष्मन्मना देइल
या उत्तेजन हो कवीन,
न [illegible]रा गाणें तयाचें मुकें;
गाण्याने श्रम वाटतात हलके, हेंही नसे थोडकें ॥

या ओळींत उद्योग-रत होऊं इच्छिणाऱ्यांना स्फूर्ति देणें व श्रस्तमनस्कांचे श्रम हलके करणें हीं काव्याचीं दोन उद्दिष्टें सूचित केलीं आहेत. तीं उघड-उघड बोधवाद आणि आनंदवाद या प्रयोजनांचींच दुसरीं पर्यायरूपें आहेत. तसेंच, त्यांच्या

पद्यपंक्तिची तरफ अमुच्या
करीं विधीने दिली असे
टेकुनि ती जनतामनांवरि
जग उलथुनि या देउं कसें ॥

याहि ओळींत काव्याच्या माध्यमांतून जनक्रांति घडवून आणण्याची, बोधवादाला पुष्टि देणारी अशी जबरदस्त महत्त्वाकांक्षा त्यांनी व्यक्त केली आहे. त्याचप्रमाणे, 'प्रतिभे' मधल्या

पिंडी जाय विलोपुनी
विरुनिया ब्रह्मांड हें सत्वर;
शब्दब्रह्म उचंबळून मग जें
दाही दिशा व्यापितें,
त्याच्यांतून भविष्यवाद निघती,
ऐकून तें सादर;
ब्रह्म्यातें क्षमता नवीन रचना-कार्यक्रमीं लाभते ॥

या ओळींत कवीने जें शब्दब्रह्म निर्माण केलेलें असतें त्यांतून निघणाऱ्या भविष्यवादांतून ब्रह्मदेवालाहि नवसृजन करण्याची स्फूर्ति मिळते, ही जी कल्पना मांडली आहे, तीमध्ये बोधवादानेच अत्यंत उत्कट, भव्य, उदात्त व सामर्थ्यशाली स्वरूप धारण केलें आहे, असें दिसून येतें.

Bee ची काव्यप्रयोजनविषयक भूमिका ही सन्दर्शी केशव-सुतांच्या विचारसरणीशीं सदृश आहे. कवीने, आपल्या स्फूर्तिप्रद शब्दांनी युक्त असलेल्या काव्याच्या द्वारें रसिकान्तःकरणांत रसिकमनाशीं समरस झालें पाहिजे या उद्दिष्टाची आवश्यकता त्यांनी प्रतिपादिली आहे. ते म्हणतातः

सोप्या सोप्या शब्दांनी स्फूर्ति सूत्राने गुंफोनी
मंजुळ मंजुळशीं गाणीं रचुनी रसिकान्तःकरणीं
हळू शिरावें चोरोनीं, जावें मीपण लोपोनी.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

जीर्ण, आनिष्ट रूढींचें भंजन करून आदर्श समाज निर्माण करण्याकरिता कवीने जनतेला स्फूर्ति द्यावी व योग्य मार्गदर्शन करावें, हा केशवसुतांचा विचार Bee नी ' फुलांची ओंजळ ' या कवितेंत अत्यंत प्रभावी, भव्य आणि उदात्त स्वरूपांत मांडला आहे. त्यांचें म्हणणें असें की, हें पूर्णापासून ढळलेलें जग पूर्णाकडे जात आहे; त्याची वाट बिकट आहे; लांबण मोठी आहे; वाटेंत चढउतार आहे, मध्येच पुष्कळ वाट चालून गेल्याचा भ्रम होण्याचा संभव आहे; तरीपण ' आनंदाला म्लानपणा नच सौंदर्याला क्षय ' अशा स्थलाकडे हें विश्वचक्र निर्भयपणें चाललें आहे; तेव्हां त्याला मार्गाची रुक्षता जाणवूं नये आणि परिश्रमांच्या प्रचंडतेमुळे अनुत्साह उपजूं नये, म्हणून—

काव्यरसामृत यास्तव कारुण्यानें निर्मुनि कवी
मृदु मधुरोज्ज्वल गीतें गाउनि तेजोबल वाढवी

अशा रीतीने त्यांच्या मतें कवीने तेजोबल वाढविणारी मृदुमधुरोज्ज्वल गीतें गाईली पाहिजेत; एवढेच नव्हे तर, कधी हित, तर कधी कटु बोलून हें सृष्टिचक्र नीट चालविण्याला हातभार लावला पाहिजे व भूतकालाच्या आधारें चालू काळ चांगला समजावून घेऊन सोज्ज्वळ भविष्यकाळाची निर्मिती केली पाहिजे. Bee ची ही कवीच्या कार्यासंबंधीची आत्यंतिक अवास्तव अपेक्षा त्यांच्या बोधवादी दृष्टिकोनाचीच स्पष्ट साक्ष नव्हे काय ?

\+ + +

असो. येथवर मी निरनिराळ्या काळांतील, देशांतील आणि भाषांतील कांही प्रमुख साहित्यकारांच्या व साहित्यशास्त्रज्ञांच्या वाङ्मयप्रयोजनविषयक भूमिकांचें कांहीसें विस्तृत स्वरूपाचें समालोचन बुद्ध्याच केलें आहे. हेतु हा की, साहित्यसृष्टींतल्या ऋषीमहर्षींकडून वाङ्मयाची कांही ठराविकच प्रयोजनें वेळोवेळीं आणि देशोदेशीं कशी मान्यता पावलीं आहेत, हें सुस्पष्ट व्हावें. या साऱ्या प्रयोजनांची सारांशवजा रूपरेषा आपणास खालीलप्रमाणें मांडतां येईल.—



या सर्व वाङ्मयप्रयोजनांचीं दोन ठळक अशीं वैशिष्ट्यें सहज प्रतीत होण्यासारखीं आहेत.

१. त्यांतील पहिलें वैशिष्ट्य हें की, बहुतेक सर्व साहित्यकारांनी आणि साहित्यशास्त्रज्ञांनी

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

प्राधान्याने रसिकनिष्ठ भूमिकेवरूनच वाङ्मय-प्रयोजनाचा विचार केलेला आहे. ज्यांनी या प्रयोजनाच्या बाबतींत आत्मनिष्ठ भूमिका स्वीकारली आहे, त्यांनी तीसुद्धा केवल व निरपेक्ष स्वरूपांत स्वीकारली नसून तिला रसिकनिष्ठ भूमिकेची जोड दिलेली आहे.

२. दुसरें आणि महत्त्वाचें वैशिष्ट्य हें की, या सर्व वाङ्मयप्रयोजनविवेचकांनी वाङ्मय हें स्वतंत्र साध्य न मानतां विशिष्ट उद्दिष्टांच्या परिपूर्तीचें एक साधन म्हणून कल्पिलेलें आहे. वाङ्मयनिर्मिती ही एक बाह्यप्रयोजननिरपेक्ष अशी पूर्ण स्वतंत्र स्वरूपाची प्रक्रिया आहे; अशी अस्सल वाङ्मय-निर्मात्याला आणि वाङ्मयास्वादाला शोभणारी रास्त भूमिका कोणीहि फारशी पुरस्कारलेली आढळत नाही. रसिकनिरपेक्ष भूमिकेवरून म्हणजे केवळ वाङ्मयनिर्मात्याच्या दृष्टीनेच या प्रयोज-नाच्या प्रश्नाचा विचार करताना, सुद्धा त्या निर्मात्याच्या सर्जनक्रियेच्या यथासांग, यथार्थ व प्रभावी परिपूर्तीला अगदी गौण लेखून त्याच्या ऐहिक व पारलौकिक उद्दिष्टावरच बहुतेक सर्व विवेचकांकडून जास्त भर देण्यांत आला आहे.

या दोन्ही वैशिष्ट्यांतून अगदी सहज रीतीने आणि स्पष्टपणें शाबित होणारी एक महत्त्वाची गोष्ट या ठिकाणीं आपण लक्ष्यांत घेतली पाहिजे. ती ही की, आत्मनेपदी व परस्मैपदी या द्विविध भूमिकांवरून मान्य करण्यांत आलेलीं उपरिनिर्दिष्ट विविध वाङ्मयप्रयोजनें, एरवी व्यक्तीच्या वा समाजाच्या लौकिक वा पारलौकिक उन्नतीच्या दृष्टीने कितीहि स्तुत्य आणि उत्तेजनार्ह असलीं तरी, खास वाङ्मयनिर्मितीच्या प्रक्रियेशीं मात्र तीं स्वाभाविकपणें आणि अपरिहार्यपणें निगडित झालेलीं नाहींत; त्या प्रक्रियेवर तीं बाहेरून लाद-ण्यांत आलेलीं आहेत. ही लादण्याची क्रिया सर्वस्वी सद्धेतुजन्य आहे, हें मान्य केलें, तरी त्यामुळे या लादलेल्या प्रयोजनांचें उपरें व आगां-तुक स्वरूप मुळीच नष्ट होत नाही !

असें जर आहे, तर मग वाङ्मयाचें स्वभाव-सिद्ध प्रयोजन कोणतें, हा साहजिकच प्रश्न उद्भवतो. या प्रश्नाचें उत्तर शोधण्याकरिता अनुगामी पद्धतीलाच अनुसरणें श्रेयस्कर होईल, असें वाटतें; कारण एखादें विशिष्ट प्रयोजन गृहीत धरून त्याची इष्टानिष्टता तपासून पाहण्यापेक्षा एखाद दुसऱ्या अव्वल दर्जाच्या वाङ्मयीन कृतीचें परिशी-लन करून तिच्या निर्मितीला कारणीभूत होणारें प्रयोजन हुडकून काढणें हेंच परिणामीं अधिक फलदायी आणि प्रतिपादनाच्या दृष्टीने अधिक शास्त्रशुद्ध स्वरूपाचें होईल. त्याकरितां वाङ्मयाचा सर्वांत श्रेष्ठ व ज्येष्ठ असा प्रकार म्हणजे काव्य: त्याचीं कांही निवडक उदाहरणें घेऊं.

केशवसुतांची 'सतारीचे बोल' या नांवाची एक कविता आहे. या कवितेबद्दल—"संगीताचा माणसाच्या मनावर होणारा परिणाम ही या कवि-तेची मुख्य कल्पना आहे. ही कल्पना केशवसुतांना स्वतंत्रपणें सुचणें अशक्य नव्हतें. तथापि, त्यांच्या आधीं इंग्रजी कवि ड्रायडन याने आपल्या 'Alexander's Feast or the Power of Music' या कवितेंत ती रंगविलेली दिसते... पालग्रेव्हचा इंग्रजी भावगीतांचा संग्रह केशवसुतांनी पाहिला असावा आणि त्यांत ही कविता आहे... ......यापलीकडे मुळाचें ऋण केशवसुतांनी कांहीच घेतलें नाही...... मूळ कल्पना जरी परकीय असली, तरी केशवसुतांची ही कविता स्वतंत्र कवितेच्या योग्यतेची ठरण्याजोगी आहे"—असा अभिप्राय 'तीर्थस्वरूपी' वृत्तीचा आणि समतोलपणाचा आव आणून प्रा. जोग खुशाल देवोत आणि तिला स्वयंस्फूर्त स्वरूपाचें श्रेय देण्याचें लाख नाकारोत; आमच्या रसिकतेची आणि सहृदयतेची साक्ष तर आम्हाला निक्षून सांगते की, या कवितेला अस्सल स्वानुभूतीचें भक्कम अधिष्ठान लाभलेलें असलें पाहिजे.

विषण्णतेच्या ढगांनी काळवंडलेलें मानवी मन, संगीत-श्रवणाने कसें निरभ्र आणि प्रसन्न होतें, ही सर्वसामान्यपणें प्रतीत होणारी अनुभूति या कवितेंत व्यक्त केली आहे. पण कवीच्या वैशिष्ट्य-पूर्ण व्यक्तित्वाच्या मुशींतून ती एरवीं लोकसाधारण असणारी अनुभूति बाहेर पडलेली असल्यामुळे तिला नवा उजाळा मिळाला आहे, स्वतंत्र तेज प्राप्त झालें आहे आणि केवळ 'एकमेवाद्वितीयम्'

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

असें साकार शब्दबद्ध रूप तिनें धारण केलें आहे. सिद्ध व्यक्तित्वाशीं विशिष्ट अनुभूतीचा संघर्ष घडून येतांच ती अनुभूति केवळ अनन्य व स्वतंत्र असें स्वरूप धारण करते, एवढेंच नाही, तर त्याचबरोबर, तिला व तिच्या सार्‍या अंगोपांगांना रम्योज्ज्वल उत्कटता आणि प्रमाणबद्ध भव्यता सहज प्राप्त होते—या वाङ्मयनिर्मितीच्या प्रक्रियेंतील महान् सिद्धान्ताचाहि आपणास या कवितेंत स्पष्ट प्रत्यय येतो. दुःखमग्न मनावर होणारा अनुकूल प्रभाव–ही या कवितेंतील प्रधान अनुभूति; पण ही अमूर्त व निराकार अनुभूति कवीच्या व्यक्तित्वाशीं संयोग घडून आल्यामुळे सावयव व देही बनली; तिच्या संपूर्ण व सर्वांगीण आविष्काराला योग्य अशीं प्रमाणबद्ध अंगोपांगें तिला सहजच प्राप्त झालीं. मनाची विषण्ण अवस्था, त्या अवस्थेनें धारण केलेलें अत्यंत तीव्र व भीषण स्वरूप, त्या विषण्णावस्थेंत कानावर सतत पडत असलेल्या 'दिडदा, दिडदा, दिडदा' या ध्वनीचा झालेला सुखसंवेदनाजनक प्रभाव आणि त्या प्रभावानें शेवटीं धारण केलेलें भव्य, गंभीर व उदात्त स्वरूप–हीं त्या स्थूल व प्राथमिक अनुभूतीस भरदार व व्यक्तित्वनिष्ठ उठाव देणारीं, चार मुख्य उपांगें होत. हा उठाव कसा घडून आला, हें पाहण्यासारखें आहे. अगदी पहिल्याच कडव्यांत—

काळोखाची रजनी होती
हृदयीं भरल्या होत्या खंती
अंधारांतचि गढलें सारें
लक्ष्य, न लक्षी वरचे तारे
विमनस्कपणें स्वपदें उचलित,
रस्त्यांतुनि मी होतों हिंडत;
एका खिडकींतुनि सूर तदा
पडले–दिडदा, दिडदा, दिडदा!

असें मनाला ग्रासून टाकणार्‍या विमनस्कतेच्या सुरवातीच्या अवस्थेचें वर्णन केलें आहे व त्याबरोबरच अस्तित्वांत असलेल्या संगीताची प्रभावशून्यताहि सूचित केलेली आहे. बाह्य भैरवांत प्रीति धारण करणार्‍या आंतील विषण्ण वृत्तीनें—

ऐकूनि तो मज जो त्वेष चढे
त्यासरशी त्या गवाक्षाकडे
मूठ वळुनि मीं हात हिसकिला;
पुटपुटलोंही अपशब्दाला,
म्हटलें–"आटप, आटप मूर्खा!
सतार फोडुनि टाकिशी न का!
पिरपिर कसली खुशालचंदा!
करिशी–दिडदा, दिडदा, दिडदा!

या कडव्यांत अति उग्र रूप धारण केलें आहे, संगीताच्या निष्प्रभतेची परिसीमा गाठली आहे आणि सतारीच्या बोलांविषयींच्या म्हणजे संगीताविषयींच्या त्वेषाला ज्वलज्जहाल अवस्था प्राप्त झाली आहे. प्रभावशून्यतेच्या पराकोटीची सीमा ओलांडल्यानंतर मात्र हळुहळू सतारीचे बोल कार्यक्षम होऊं लागतात, असें लगेच पुढल्या कडव्यांत दाखविलें आहे—

सरलों पुढता चार पावलें,
तों मज न कळे काय जाहलें;
रुष्ट जरी मी सतारीवरी
गति मम वळली तरि माघारी
ध्वनिजालीं त्या जणू गुंतलों
असा स्ववशता विसरुनि बसलों–
एका ओट्यावरी स्थिर तदा
ऐकत–दिडदा, दिडदा, दिडदा!

यथावकाश सतारीच्या बोलाचा प्रभाव वाढूं लागला, विमनस्कता ओसरूं लागली. सतारींतून निघणार्‍या पोषक सुस्वरांतील उदात्ततेनें मनाला भारून टाकलें; मन उदात्ततेशीं समरस झालें, इतकें की,

तों मज गमलें विभूति माझी
स्फुरत चालली विश्वामाजी
दिक्कालासहि अतीत झालों;
उगमीं विलयीं अनंत उरलों;
विसरुनि गेलों अखिल भेदां
ऐकत–दिडदा, दिडदा, दिडदा!

अशा भव्यविशाल अवस्थेचा त्याला प्रत्यय आला आणि शेवटीं—

शांत वाजली गती शेवटीं,
शांत धरित्री, शांत निशा ती,

अनुक्रमणिका

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

शांतच वारे, शांतच तारे,
शांतच हृदयीं झालें सारें!
असा सुखें मी सदना आलों,
शांतींत अहा! झोपीं गेलों
बोल बोललों परी किंतकिदा–
स्वप्नीं–दिडदा, दिडदा, दिडदा!

अशा विकारविमुक्त व सखोल स्वरुपाच्या शांतीचा आणि समाधानवृत्तीचा त्याला अलौकिक साक्षात्कार झाला!

'सतारीचे बोल' या कवितेचें कांहींसें स्थूल असें हें विश्लेषण केल्यानंतर तिच्यासंबंधीं आपण मुद्याचा प्रश्न विचारूं शकतों – कोणत्या विशिष्ट उद्दिष्टाच्या परिपूर्तीकरिता कवीने ही कविता लिहिली? म्हणजेच, या कवितेचें प्रयोजन कोणतें? रसिकांना रमविण्याकरिता किंवा त्यांना संगीताच्या सामर्थ्याचा धडा देण्याकरिता कवीने ही कविता लिहिली, असें म्हणण्याचें वेडें धाडस कोणत्याहि सुबुद्ध रसिकाला अर्थात्च करवणार नाही, असें वाटतें; कारण या कवितेंतील विशिष्ट अनुभूतीला व्यक्त करीत असतांना, कवीच्या मनश्चक्षुसमोर मनोरंजित वा उद्बोधित करावयाचा रसिकवर्ग उपस्थित नव्हता; नव्हे, त्यावेळीं त्याला रसिकवर्गाच्या अस्तित्वाची जाणीव सुद्धा नव्हती. तेव्हा ही कविता निर्माण करण्याच्या क्रियेच्या मागे कवीची भूमिका पूर्णपणें रसिकनिरपेक्ष होती, हें निश्चित. रसिकनिष्ठ प्रयोजनाच्या समर्थनाची संभवनीयता नष्ट झाल्यानंतर, या कवितेच्या निर्मितीच्या बाबतींत उपरोक्त आत्मनेपदी प्रयोजनांपैकी एखादें तरी प्रयोजन लागू पडतें की काय, याचा पडताळा घेतला, तरी सुद्धा नकारच स्वीकारावा लागतो; कारण कवीने ही कविता कीर्तीकरिता, पैशाकरिता, अशुभनिवारणाकरिता वा पारमार्थिक कल्याणाकरिता लिहिली आहे, असें सिद्ध करणारा यत्किंचित् सुद्धा पुरावा कोणत्याहि प्रामाणिक व सहृदय रसिकाला या कवितेंत सापडणें शक्य नाही.

असें जर आहे, तर मग कवीने ही कविता कशाकरिता लिहिली, कोणत्या हेतूच्या सिद्धीसाठी लिहिली, याचा शोध घेतला पाहिजे. संगीतश्रवणाने दुःखव्याप्त मनाचें अस्वास्थ्य नाहीसें होऊन त्याला शांतीचा लाभ होतो, या लोकसाधारण अनुभूतीचा कवीच्या व्यक्तित्वाशीं संयोग घडून येतांच त्या व्यक्तित्वाशीं सुसंवादी असा तिचा प्रमाणबद्ध पण पूर्ण विकास घडून आला; ती विकसित अनुभूति, तिच्या सर्व अंगोपांगांसहित उत्कट रूप धारण करूं लागली; ती उत्कटता हळूहळू तीव्र होऊं लागली; ती तीव्रता शेवटीं इतकी वाढली की, ती उत्कट, विकसित अनुभूति यथार्थाविष्काराकरिता विलक्षण आवेगाने धडपड करूं लागली. कवि अति अस्वस्थ झाला. परिपूर्ण, प्रभावी आणि यथार्थ अशा मूर्त शब्दबद्ध रूपांत प्रकट होण्याकरिता धडपड करूं लागलेल्या अनुभूतीची सर्वांगीण परिस्फुटता केल्याशिवाय कवीला चैन पडेनासें झालें. दांडग्या आवेगाने उफाळून आलेल्या त्या अनुभूतीच्या आविष्काराच्या वेदनांचा भार कवीला अगदी असह्य झाला; शेवटीं त्या अनुभूतीला व तिच्या व्यक्तित्वसंघर्षजन्य अंगोपांगांना अति समुचित आणि समर्पक अशा सप्रमाण साकार शब्दबद्ध रूपांत अभिव्यक्ति दिल्यानंतरच त्याच्या मनावरचा ताण कमी झाला आणि शेवटीं यशस्वी आविष्काराच्या अपूर्व समाधानाच्या संप्राप्तीने या सर्जनप्रक्रियेची सांगता झाली.

सर्जनप्रक्रियेच्या या कांहीशा तपशीलवार विवेचनामुळे उपरोक्त कवितेच्या आणि पर्यायाने सर्वच अस्सल काव्याच्या व वाङ्मयाच्या प्रयोजनावर स्पष्ट प्रकाश पडतो आणि अभिव्यक्तीकरिता अनावर आवेगाने उचंबळून आलेल्या विशिष्ट व्यक्तित्वनिष्ठ जीवनानुभूतीला अगदी अपरिहार्य झाल्यामुळे सर्वांगीण अशा शब्दमय स्वरूपांत आविष्कृत करणें हें वाङ्मयाचें आद्य प्रयोजन आहे, हें सहज व स्पष्टपणें सिद्ध होतें. यथार्थाभिव्यक्तीच्या या आद्य प्रयोजनाने प्रेरित झाल्यानंतर कवि वा लेखक स्वतःवर त्याच वाङ्मयीन कृतीच्या बाबतींत आत्मोद्धारावर आधारलेलीं आत्मनिष्ठ प्रयोजनें वा रसिकांना रिझविण्याकरिता अथवा उपदेशण्याकरिता रसिकनिष्ठ प्रयोजनें स्वखुषीने खुशाल लादून घेऊं शकतो; पण आविष्काराच्या आद्य प्रयोजनाच्या

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

प्रेरणेचा अभाव असला; तर कोणतीहि शब्दबद्धकृति, इतर अवांतर गुणांनी युक्त असली तरी, वाङ्मय या पदवीवर आपला हक्क कधीच शाबित करूं शकत नाही. एखादी वाङ्मयीन कृति आविष्काराच्या आद्य प्रयोजनाने प्रस्फुरित होऊन निर्माण झाली आहे किंवा नाही, हें खऱ्या रसिकाच्या सहृदयतेला तात्काळ प्रतीत होतें; आणि, मग जर तींत या प्रयोजनाचा अभाव आढळून आला, तर ती कृति; इतर बाह्य प्रयोजनांनी विभूषित करण्यांत आली असली तरी, त्याचें मन ती मुळीच आकर्षित करूं शकत नाही. उदाहरणार्थ, गोविंदाग्रजांची 'अरुण' ही कविता पाहा:—

अहा! उगवला पहा अरुण हा उधळित तेजाला
जगा जागवी, तसा जागवी कविच्या चित्ताला

या सुरवातीच्या ओळींपासून

रविसदनाच्या गवाक्षास ही काय लाल कांच!
पल्याड लपलें तोंड तयाचें, दिसेल आताच

या ओळींपर्यंत वाचीत येतांच "स्वानुभूत वासाचें दान" करावयास न मिळाल्यामुळे या कवितेंत नुसती 'कर्णिकार सुमनांची भरती' झाली आहे, असा खेदजनक प्रत्यय येऊं लागतो. अरुणाच्या समरसतापूर्ण दर्शनानें उजळलेल्या व उत्स्फूर्त झालेल्या अनुभूतीच्या कल्लोळाचें या सबंध कवितेंत यत्किंचित्हि अस्तित्व जाणवत नाही, तसेंच, ज्याच्याशीं संघर्ष झाल्यामुळे आत्मगत अनुभूतीला नवनवे अंकुर फुटून तिला उत्कट व भव्य स्वरूप प्राप्त होतें, अशा कवीच्या खास व्यक्तित्वाचा ठसा चुकून सुद्धा तींत कोठेहि उमटलेला दिसून येत नाही. त्यामुळे अशा कवितांत रसशून्य आणि कृत्रिम उपेक्षांच्या फुलझड्यांनी भोळ्याभाबड्या व गाजर-पारखी रसिकांना डोलविण्याचें सामर्थ्य असलें, तरी त्यांत व्यक्तित्वनिष्ठ अनुभूतीच्या आविष्काराच्या आद्य प्रयोजनाचा अभाव असल्यामुळे त्यांना काव्य वा वाङ्मय म्हणणें निव्वळ वेडेपणाचें ठरतें. गडकऱ्यांच्या बहुतांश नाट्यवाङ्मयाला सुद्धा जवळ-जवळ हाच अभिप्राय लागूं पडतो. 'भावबंधना'-चीच गोष्ट घ्या ना. या नाटकासंबंधीं त्यांना सुच-लेल्या—'एक भाबडा म्हातारा एका पक्क्या बिलंदराच्या तावडींत सापडतो'—या मूळच्या साध्या पण आकर्षक कल्पनेचासुद्धा त्यांना प्रमाणबद्ध, एकसूत्री आणि संस्कारक्षम विकास साधतां आला नाही. त्या कल्पनेचें पूर्ण आणि यथार्थ दर्शनच त्यांना झालें नाही. कारण, त्यांच्या-जवळ अनुभूति नव्हती आणि व्यक्तित्वहि नव्हतें. व्यक्तित्वाचा एवढा अलौकिक प्रभाव असतो की, त्याच्यामुळे एखाद्या सुचलेल्या कल्पनेला वा विचाराला आपोआप एकसूत्रीपणा व एकसंधीपणा प्राप्त होतो, त्याच्या घडणींत सहजगत्याच रमणीय प्रमाणबद्धता साधली जाते. अर्थात् जिथे व्यक्तित्व-प्रधान अनुभूतीचें उत्कट व अनावर स्फुरण नाही, अशा या तथाकथित वाङ्मयाच्या बाबतींत आवि-ष्काराच्या आद्य प्रयोजनाच्या प्रचीतीचा प्रश्नच उद्भवत नाही!

उलट, याच गडकऱ्यांच्या 'निर्दय बालेस', 'हृदयास', 'शेवटचें प्रेमगीत' या प्रेमनिराशा-विषयक कवितांत उत्कृष्ट काव्यगुणांचा संयमशील विलास झालेला आढळून येतो; कारण यांतील प्रेमनिराशेची भावना ही जिवंत व तीव्र अनु-भूतींतून उद्भूत झालेली आहे; आणि, कवीच्या कांहीशा रडव्या व हळव्या व्यक्तित्वाशीं ती संघर्षित झाल्यामुळे तिच्या व्यक्तीकरणांत निरा-ळाच गोडवा निर्माण झाला आहे. अर्थात् उघड उघडच या कवितांमध्ये प्रीतिकारणाच्या दारुण विफलतेला व्यक्त करण्याची विलक्षण पण व्यक्तित्वनिष्ठ धडपड असल्यामुळे या कवितांत आविष्काराच्या आद्य प्रयोजनाची सहज रीतीने परिपूर्ति झाली आहे.

असो. अशा रीतीने इतर अस्सल वाङ्मयीन कृतींचें असेंच परीक्षण केलें, तर वाङ्मयाच्या मूल्यमापनांत आविष्काराच्या आद्य प्रयोजनाचें महत्त्व कसें निरपवाद आणि निर्विवाद आहे, हें आपोआप सिद्ध होईल. या आविष्काराच्या प्रयोजनासंबंधीं आणखी एकदोन गोष्टी मला स्पष्ट करणें आवश्यक आहे. पहिली गोष्ट ही की, मीं प्रतिपादिलेली आविष्करणाची क्रिया ही निर्मा-त्याच्या दृष्टीने आनंददायी असते. हा आनंद मात्र नवीन वस्तु लाभल्याचा आनंद नसतो. वा

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

रसिकांना खूष केल्याचा वा शहाणपण शिक-विल्याचा आनंद नसतो; हा आनंद व्यक्ती-करणाच्या वेदना शमल्यामुळे मनावरचा ताण पूर्णपणें ओसरल्याचा आनंद असतो. याच आविष्काराच्या सर्वस्वी आत्मनिष्ठ स्वरूपाच्या आनंदाचें वर्णन कविवर्य 'केशवसुतांनी' 'कविता आणि कवि ' या कवितेंतलि—

करूनिया काव्य जनांत आणणें
न मुख्य हा हेतु मदीय मी म्हणें;
करूनि तें दंग मनांत गुंगणें,
तदीय हा सुंदर हेतु मी म्हणें —

या ओळींत केलें आहे. त्यांनी एका प्रसिद्धिलोलुप कविमित्राला लिहिलेलें पत्र, जें नुकतेंच 'महाराष्ट्र साहित्यपत्रिके 'त प्रसिद्ध झालें आहे, त्यांतहि आविष्काराच्या व त्यापासून मिळणाऱ्या रसिक-निरपेक्ष आनंदाच्या प्रयोजनाचें समर्थन खालील वाक्यांत केलें आहे—

" तुम्हाला स्वानंद पाहिजे आहे काय! स्वानंद हें कवीचें उत्तम पारितोषिक होय, यांत शंका नाही. पण खाज सुटली असतांना खाज-विल्याने जो आनंद होत असतो; तसला आनंद काय कामाचा? सगळे ऐहिक आनंद याच मास-ल्याचे आहेत. त्यांच्या परिणामीं हळहळच रहा-वयाची. तर उत्तम पारितोषिक असा टिकाऊ आनंद कसा मिळवावयाचा, याचा विचार तुम्हीच करा. तो मिळूं लागला, म्हणजे मजकडे किंवा कोणाकडेच पद्यलेख पाठविण्याची तुमची आतुरता जिरेल."

मी पुरस्कारीत असलेल्या वाङ्मयाच्या या यथार्थाविष्काराच्या प्रयोजनाला अगदीं अनुकूल अशी भूमिका महाराष्ट्रांतील कविश्रेष्ठ आत्माराम रावजी देशपांडे यांनीहि घेतलेली आढळते. ते आपल्या 'मी का लिहितों?' या लेखांत लिहितातः—

" मला वाटतें, नुसतें काव्य लिहिणाराला मी का लिहितों, हें सांगणें चांगलेंच अवघड आहे. कांही कवींनी तर असेंहि म्हटलें आहे की, कोकिळाला 'तूं कुहूकुहू का करत्येस' हें विचार-ण्यासारखेंच कवीला 'तूं कविता का करतोस' हें विचारणें आहे. यांत थोडासा "कविपणा" चा भाग आहे, हें मला कबूल आहे; पण थोडें सत्यहि आहे. कवि आपल्या कृतीला आपला स्वभाव समजत असतो......भावनांना हलविणाऱ्या गोष्टी जेव्हा घडतात, तेव्हा संवेदनाक्षम हृदयावर त्या आघात करतात. त्या आघातांनी जो कल्लोळ उठतो, तो शब्दांत व्यक्त होण्यासाठी धडपडत असतो. शब्दांत व्यक्त झाल्यामुळे त्या क्षणापुरता तरी हृदयावरचा भार हल्का झाल्यासारखा वाटतो. भावनांच्या कल्लोळाला शब्दांनी व्यक्त करून हृदयाचा भार कमी करण्यासाठींच मी आतांपर्यंत लिहिलें. अजूनहि कधीकाळीं त्याच कारणासाठी लिहीत असतों."

खरा जातिवंत साहित्यकार हा यथार्थ आत्मा-विष्काराच्या आद्य प्रयोजनाच्या परिपूर्तीकरिताच सदैव धडपडत असतो. या माझ्या सिद्धान्ताचा महाराष्ट्रांतील सुप्रसिद्ध, पुरोगामी व स्वतंत्रप्रज्ञ कादं-बरीकार रा. पु. य. देशपांडे यांनी फारच जोरदार भाषेंत पुरस्कार केला आहे. ते आपल्या 'माझ्या आयुष्यांतील एक अपघात' या लेखांत लिहितात—" तुम्ही लेखन कसें करूं लागलात?–का करूं लागलात?—असे प्रश्न मला विचित्र वाटतात... 'तुम्ही श्वसन कसें करूं लागलात? का करूं लागलात?' असें जर मीं तुम्हाला विचारलें, तर तुम्हाला तें जितकें विचित्र व चमत्का-रिक वाटेल, तितकेंच मलाहि माझ्या लेखनाबाबत विचारण्यांत येणारे प्रश्न चमत्कारिक वाटतात."

तेव्हा, एखादा लेखक वा कवि का लिहितो, कोणत्या विशिष्ट प्रयोजनाच्या परिपूर्तीकरिता लिहितो, या प्रश्नाचें सरळ उत्तर—'तो लिहिल्या-शिवाय राहवत नाही म्हणून लिहितो, आत्मा-विष्काराचा आनंद लुटण्यासाठी लिहितो'—असेंच द्यावें लागतें आणि यथार्थाविष्कार हेंच वाङ्मयाचें आद्य प्रयोजन होय, हें मान्य करावें लागतें.

या आविष्काराच्या प्रयोजनासंबंधीं दुसरीहि एक महत्त्वाची गोष्ट लक्ष्यांत ठेविली पाहिजे. ती ही की, सर्वच अस्सल वाङ्मयीन कृतींची निर्मिती निर्भेळ आविष्काराच्या प्रयोजनाच्या प्रेरणेंतून झालेली नसते. 'ज्ञानेश्वरी', 'तुकारामाचे

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

अभंग ', ' हरिभाऊंच्या कादंबऱ्या ' या सारख्या कितीतरी खऱ्या वाङ्मयीन कृती सांपडतील की, ज्यांच्या निर्मितीला आत्माविष्काराच्या प्रयोजना-बरोबरच बाकीचीं आत्मनेपदी व परस्मैपदी प्रयोजनेंहि कारणीभूत झालीं आहेत. पण या आत्मनिष्ठ व रसिकनिष्ठ प्रयोजनांच्या अस्तित्वामुळे मूळच्या आद्य आविष्काराच्या प्रयोजनाचें महात्म्य मात्र मुळीच नष्ट होत नाही. तें पूर्णपणें अबाधित राहातें आणि राहिलेंच पाहिजे; कारण वाङ्मयाचें वाङ्मयत्व हें आत्मनेपदी वा परस्मैपदी प्रयोजनांच्या परिपूर्तीत नसून व्यक्तित्वनिष्ठ अनुभूतीच्या यथार्थाविष्करणाच्या आद्य प्रयोजनाच्या सर्वांगीण सफलतेंत आहे; म्हणून 'उरलों आविष्कारापुरता' ही पु. य. देशपांडे यांनी पुरस्कारिलेली भूमिकाच खऱ्या, जातिवंत, अस्सल वाङ्मयनिर्मात्याची भूमिका आहे, असें मला वाटतें.

\+ + +

माझ्या वाङ्मयाच्या मूल्यमापनाच्या पद्धतींत मीं आविष्कार-विचारास अनन्यसाधारण महत्त्व दिलें आहे; त्यामुळे माझ्या एतद्विषयक पूर्ण विचार-सरणीला मी 'आविष्कारवाद' ही संज्ञा देऊं इच्छितों. या आविष्कारवादाचे उरलेले इतर पैलू मी पुढील लेखांकांत स्पष्ट करीनच; पण तोपर्यंत पाश्चिमात्यांच्या साहित्यशास्त्रीय विचारांमध्ये 'Expressionism' ही संज्ञा ज्या अर्थानें प्रचलित आहे, त्याचा, माझा 'आविष्कारवाद' हा आंधळा अनुवाद आहे, अशी वाचकांनी चुकीची कल्पना करून घेऊं नये. माझा आविष्कारवाद बहुतांशीं मौलिक आहे, असा बाणा मी बाळगूं इच्छितों; अर्थात सबंध लेखमाला प्रसिद्ध झाल्यानंतर त्या बाण्याला यथार्थतेचें अधिष्ठान कितपत लाभलें आहे, हें ठरविणें प्रामाणिक, पूर्वग्रहालिप्त व व्यासंगी वाचकांच्या निर्णयावरच अवलंबून राहणार आहे.

• • •

स्पेनमधून आलेली विधवा

मूळ लेखक–जे. डब्ल्यू. वॅलेस
अनुवादक–द. चि. सोमण

● जे. डब्ल्यू. वॅलेस याचा जन्म अमेरिकेंत इ. स. १९०७ मध्ये झाला. परंतु त्याचे शिक्षण मात्र इंग्लंडमध्ये झाले. इ. स. १९२३ पासून बरींच वर्षे त्याने दक्षिण अमेरिकेंत ब्रिटिश मालकीच्या एका रेल्वे कंपनींत नोकरी केली. पुन्हा लंडनला येऊन थोड्याच दिवसांत स्पेनमध्ये यादवी सुरू होण्याच्या सुमारास तो स्पेनमध्ये गेला. त्याच्या लघुकथा लोकप्रिय असून 'पासिंग शो' अमेरिकेंतील 'एस्क्वायर,' 'पंच'–वगैरेंतून त्या प्रसिद्ध झालेल्या आहेत.

* * *

यादवी सुरू व्हायची चिन्हें दिसायला लागतांच इतर अनेक धनाढ्यांप्रमाणें कारलॉसनेंहि आपले पैसे इथे लंडनमधेच बँकेंत ठेवले, हें बरें झालें कारण मलाच देऊन टाकले आहेत ना त्याने ते सगळे! आश्चर्य आहे की नाही ?"

"त्यांत कसलें आश्चर्य ?"

"वा! खरें म्हटलें, तर हा सर्व पैसा तो आपल्या एखाद्या आशाला द्यायचा आणि मी नीट वागलें, तरच त्यांतला थोडा थोडा मला मिळायचा, अशी कांही तरी व्यवस्था वास्तविक करायचा! माझा एक पाय कुणाच्या तरी पायाला बांधलेला हवा ना नेहमी!"

"इतका मत्सरी, संशयी होता तो ?"

"कमाल मत्सरी नी संशयी! तुला सांगितलें कीं नाही, आठवत नाही मला. नसेलच बहुतेक सांगितलें. पण जेव्हा ॲनिटा–त्याची

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

पहिली बायको-क्षयाने अंथरुणाला खिळून होती, तेव्हापासूनच ……! समजलें? त्याच्या आप्तांना माझा फार राग यायचा. त्याचें मन वळवून त्यांनी माझी शिकवणी बंद केली. त्याच्या दोन लहान मुलांना इंग्लिश शिकवायची मी! त्या आप्तांच्यामुळेच तर मला तें घरहि सोडावें लागलें. परंतु कारलॉसला मी हवी असणारच! त्याने गांवाबाहेर माझ्यासाठी एक लहानसा बंगला घेऊन माझ्या राहण्याची व्यवस्था केली. पण तिथे सुद्धा त्याने काय केलें, आहे ठाऊक?"

"काय?"

"तिथे जी मोलकरीण होती ना माझ्यासाठी ठेवलेली तिला त्याने चक्क ताकीद दिली होती बाहेरच्या फाटकाला कुलूप लावून ठेवायची! तुरुंगच होता तो, समज. बंगल्याच्या आवारा-भोंवती चौफेर उंच भिंत आणि फाटकाला लठ्ठ कुलूप! मीहि विशेष वाटून न घेण्याचें ठरविलें. इंग्लंडच्या तिथल्या अधिकाऱ्याकडे तक्रार करून आपल्याच अब्रूवर शिंतोडे उडवून घ्यायचें टाळलेंच मीं! तेव्हा कांही लग्न झालेलें नव्हतें आमचें! साऱ्या गोष्टी उजेडांत येणें इष्ट नव्हतेंच! आणि, तशी सुखांतच होतें मी! तसें कांहीच कमी नव्हतें. अगदी कुठे हिंडायचें नाही, त्यामुळे हातांपायांना व्यायाम होत नसे, एवढीच काय ती उणीव होती. मीहि खुशाल एक सायकल विकत आणली व आवारांतल्या आवारांतच सायकलवर बसून हिंडायला लागलें!"

"सायकलवर?"

"हो! तसें आवार मोठें होतें तें आणि व्यायामाशिवाय कसें कंटाळल्यासारखें व्हायचें! क्वचित् एखाद्या वेळीं कारलॉसच्या मोटारींतून आम्ही दोघे फिरायला जात असूं! परंतु चालत?-नांव नको घेऊंस-एखाद्या सर्वसाधारण माणसा-सारखें चालायचें काय, असें मला वाटतें कारलॉसला वाटायचें! पन्नास वय असेल त्याचें, तसा लठ्ठ नव्हता तो, पण जरा त्याच धर्तीवर! असायचाहि आपल्याच ऐटींत, तो कसा चालेल रस्त्यांतून?- त्याला हवी मोटारच! माझें मात्र हाल!"

"एकटी का नव्हतीस जात फिरायला? त्याचें मन वळवितां आलें असतें तुला! तशी मोठी लाघवी आहेस तूं, केव्हाच वळला असता तो!"

"तसा प्रयत्न केलाच मीं, तथापि फार भ्यायचा तो! त्याला वाटे, ही एकटी कुठे बाहेर गेली कीं, दुसऱ्या एखाद्या इंग्लिश मनुष्याशीं हिची ओळख होईल आणि जातील दोघे पळून! अर्थात् तसें घडलें नसतेंच. मलाहि त्याला सोडा-यची इच्छा नव्हतीच! आईबापांना देखील न कळवितां राहत होतें मी त्याच्याजवळ!"

"आता सर्व हकीकत सांगशील ना त्यांना?"

"खूपच विचारतेस! त्यांना खरें सांगून कसें चालेल? आत्महत्या का करायला लावूं त्यांना! मी त्यांना सांगणार की, कार्लॉस मरायच्या थोड्याच दिवस अगोदर आमचें रीतसर लग्न झालें होतें!"

"पण कारलॉस मेला कसा असा एकदम?"

"जसे चार लोक मेले, तसा. त्याच्या डोक्याचा नेम धरून पिस्तुल झाडण्यांत आलें!"

"राजपक्षाच्या लोकांनी मारलें त्याला?"

"हूं!"

"नीच लोक! मला वाटतें, सापडेल त्याला ठार करीत ते हिंडले!"

"छे, असें मुळीच नाही! नीट विचार करून त्यांनी अगोदर याद्या तयार केल्या व मगच वध-सत्र आरंभिलें. खरें म्हणशील, तर राजपक्ष काय नी लोकपक्ष काय, दोन्ही सारखेच!"

"किती शांतपणें बोलते आहेस तूं सगळें? खरें सांगूं?-माझ्या नवऱ्याला जर असें मरण आलें असतें, तर राजपक्षाला लाख शिव्या मोजल्या असत्या मीं!"

"मी आहे ती अशी आहे! कारलॉसला झाली ती शिक्षा योग्यच झाली, असें माझें प्रामाणिक मत आहे, बघ!"

"शिक्षा योग्यच झाली म्हणतेस?"

"हो, जशास तसें!!"

"म्हणजे? त्याने गुन्हा तरी कोणता केला होता असा?"

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

"त्याच्या आश्रयाला आलेल्या एका माणसाशीं फार नीचपणानें वागला तो!"

"तुझ्या ओळखीचा आला होता आश्रयाला कुणी?"

"छे, पाहिलें सुद्धा नव्हतें मीं कधी त्याला त्यापूर्वी! जेव्हा लोकपक्षानें शहर ताब्यांत घेतलें, तेव्हा त्यानें मला घरांत लपायला परवानगी द्यायची प्रार्थना केली. प्रथम मी नकारच दिला, पण तो फारच गयावया करायला लागला, अगदी तरुण होता बघ! वीस–बावीस वय असेल फार तर, देखणाहि होता चांगला! शेवटीं दया येऊन मीं त्याला स्वयंपाकघरांत जाऊन बसायला सांगितलें! कुणी आलें, तर 'हा आमचा बागवान आहे!'–असें सांगायलाहि मीं मोलकरणीला बजावलें, त्यालाहि योग्य त्या सूचना देऊन ठेवल्याच! कारलॉस शहरांत गेला होता तेव्हा! थोड्या वेळानें तो परत आल्यावर सर्व हकीकत मीं त्याला सांगितली! फार रागावला तो!' आपण त्याला आश्रय दिल्याचें लोकपक्षाला कळलें, तर आपली धडगत नाही! 'फार वाईट आहेस तूं!' 'तो तुझा मित्रच असला पाहिजे!'–काय तोंडाला येईल तें कारलॉस बडबडत होता. अखेर तो सापडला, तर आपण सांगूं की, आमच्या नकळतच हा आमच्या घरांत शिरला' असें पुनः पुन्हा मीं म्हटलें, तेव्हा खूप कुरकुरत एकदाचा कबूल झाला तो!–मी पुन्हा माझ्या खोलींत गेलें. पण माझी पाठ वळल्यावरोबर कारलॉसनें टेलिफोन करून त्या तरुणाचा पत्ता लोकपक्षाला दिला आणि–आणि ते लोक आलेच! त्यांच्याबरोबर जातांना त्या तरुणानें विलक्षण नजरेनें माझ्याकडे पाहिलें! मी कारलॉसकडे पाहून मान हालविली! माझा आशय त्या तरुणाच्या लक्ष्यांत आला असावा! कारलॉसकडे तिरस्कारानें पाहत तो घराबाहेर पडला. थोड्याच दिवसांत लोकपक्षानें त्याला गोळी घालून ठार केल्याचें माझ्या कानांवर आलें! सांग आता–!! मी म्हणतें, हें खरें की नाही?"

"हं!"

"आणि, बरोबर एक आठवड्यानें काय झालें, माहीत आहे? लांबून येणारा तोफाबंदुकांचा आवाज जवळ जवळ ऐकूं येऊं लागला, दोनतीन विमान–हल्लेहि झाले व राजपक्षाच्या लोकांनी हां हां म्हणतां शहर ताब्यांत घेतलें! लोकपक्षाच्या प्रत्यक्ष लढणाऱ्या लोकांशिवाय कुणालाहि पळून जायला सांपडलें नाही! आता मात्र कारलॉसची पाचावर धारण बसली. त्या राजपक्षीय तरुणाला लोकपक्षाच्या हवालीं केल्याबद्दल आपल्याला प्रायश्चित्त मिळणार, हें त्यानें ओळखलें. रातोरात घरांतून पळून लोकपक्षाच्या ताब्यांत असलेल्या भागांत जायला निघायच्या गोष्टी बोलायला त्यानें सुरवात केली! तथापि मी होतें ना! मी इंग्लिश आहें, असें मी सांगेन, म्हणजे या घरांत कुणी शिरणार नाही, तूं स्वस्थ बस! मी तुला खास वाचवीन!!–वगैरे सांगून मीं त्याला ठेवून घेतलें!"

"पुढे?"

"पुढें ना? पुढे दोन दिवस कांहीच घडलें नाही! कारलॉस जीव मुठींत धरून घरांत वावरत होता; बाहेर एखादी मोटार वाजली की, हळूच खिडकीचा पडदा किंचित् दूर करून पाहायाचा व मोटार पुढें गेली की, कपाळावरचा घाम पुसायाचा!–तिसऱ्या दिवशीं मोलकरीण सांगत आली की, राजपक्षाचे लोक प्रत्येक घर तपाशींत हिंडायला लागले आहेत! कारलॉस पळत माझ्या झोपावयाच्या खोलींत गेला नी कपडे ठेवावयाच्या कपाटांत लपला. मी माझे कोट, लांब झगे नी कितीतरी इतर त्याच्यासमोर टांगून ठेवले; त्याचे बूट दिसतच होते, ते ब्लँकिटांच्या घड्यावर ठेवून मीं झाकून टाकले. इतकें झालें, तरी त्या कपड्यामागे कुणी तरी लपलेलें आहे, हें एखाद्या लहान मुलानेहि ओळखलें असतें! सारखें हंसू येत होतें मला! एकदा तर मधेंच खोलीबाहेर मी पोटभर हसून घेतलें!"

"हंसून घेतलेस?"

"हो कुठलेंहि संकट आलें की, हंसूच येतें मला! मी तरी काय करूं?"–झालें, १० मिनिटांतच बंगल्यासमोर एक मोटर येऊन उभी राहिली व

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

हातांत बंदुका व पिस्तुलें घेतलेले सहा सात लोक तिच्यांतून खाली उतरले. मी घाईघाईने पुढे जाऊन दार उघडलें आणि मी इंग्लिश असल्याचें त्यांना सांगितलें! ते जायला निघाले, पण मीच त्यांना सर्व हकीकत सांगितली! राजपक्षाच्या एका मनुष्याला लोक-पक्षाच्या ताब्यांत विश्वासघाताने देणाऱ्या कारलॉसवर भयंकर चिडले ते! "माडीवर जिन्याजवळच्या खोलींत उजव्या हाताकडल्या कपडे ठेवायच्या कपाटांत आहे तो!! त्याला काय शिक्षा करायची तुम्हीच ठरवा!"–मी म्हटलें! – आणि, मग एका खोलींत गच्च डोळे मिटून कोचावर बसलें. ते लोक कारलॉसला घेऊन जाईपर्यंत मी डोळे उघडलेच नाहीत!!

"किती भयंकर आहेस तूं! प्रत्यक्ष नवरा ना तो तुझा!!"

"हं, पण त्याने तरी त्या तरुणाचा विश्वास-घात का करावा? – सांग–!"

"काय झालें त्याचें पुढे?"

"कुणाचें?"

"कारलॉसचें!"

"त्याचें काय व्हायचें अधिक? त्यालाहि बंगल्यासमोर रस्त्यावरच पिस्तुलाने मारलें त्या लोकांनी!

"फारच भयंकर! छे – ! – तूं कारलॉसचा खून केलास, असें नाही तुला वाटत?"

"मुळीच वाटत नाही तसें! यांतलें कुणाला कांही सांगूं नकोस मात्र! लोक कसे असतात, ठाऊकच आहे तुला! उगाच गैरसमज व्हायचा त्यांचा!! कारलॉसच्या पैशासाठीच मीं हें सारें केलें, असें सुद्धा म्हणायला कमी करायचे नाहीत ते!"

"हं, इतकें कांही अशक्य नाही तें!!"

"काय अशक्य नाही? लोक असें म्हणतील हे, का मीं पैशासाठी असें केलें, हें? अं – ?"

"जाऊं दे...... !!!"

• • •

तिरपी मान

शांताराम, एम्. ए.

● छायाचित्रांत गुणी माणसांची मान तिरपी का येते, याचें खुमासदार विवेचन नागपूरचे मार्मिक लेखक 'शांताराम' यांच्या या लघु-निबंधांत आढळेल.

* * *

माझ्या एका मित्राला माझं एक छायाचित्र हवं होतं. "...मी एक अल्बम तयार करीत आहे. तुझाहि एखादा फोटो त्यांत असावा, अशी माझी इच्छा आहे. तुला आवडलेला स्वतःचा एखादा फोटो पाठवून द्यावा......" त्याच्या या पत्राप्रमाणें माझा एक बऱ्यापैकी फोटो त्याला पाठविला.

त्या फोटोची पोच देतांना लिहिलेल्या पत्रांत त्याने मला आपल्या मार्मिक निरीक्षणाचा नमुना पाठविला. "...माझ्या पत्राला तूं तातडीने सक्रीय उत्तर दिल्याबद्दल आभार. तूं इतक्या उत्साहाने माझ्या पत्राला मान देशील, अशी मात्र माझी कल्पना नव्हती. सिनेमानटी जशी आपल्या चाहत्याला फोटो पाठवून अधिक चाहते मिळ-वायला उत्सुक असते, तसा तूं नसावास, असा अंदाज आहे. सिनेमानटीवरून आठवलं म्हणून लिहितों: माझ्या संग्रहांत नटी, कलावंत, साहित्यिक, राजकारणी–वगैरे गुणी लोकांच्या फोटोंची संख्या आता बरीच झाली आहे. या सर्व फोटोंकडे पाहतांच एक गोष्ट माझ्या चटकन् ध्यानांत आली. ती ही की, या एवंगुणविशिष्ट व्यक्तींच्या आणि चारचौघासारख्या साध्यासुध्या

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

माणसांच्या फोटोंत एक ठळक फरक असतो. हा भेद तर माझ्या इतका डोळ्यांत भरला आहे कीं, मी कोणताहि फोटो पाहून सांगूं शकेन तो फोटो कुणाचा आहे! म्हणजे, तो फोटो साध्यासुध्या माणसाचा आहे की, गुणी माणसाचा आहे, हें पटकन् ओळखण्याची एक गुरुकिल्ली मला गवसली आहे. ती ही कीं, ज्याची मान फोटोंत तिरपी ठेवलेली आहे, तो गुणी समजावा. याशिवायहि इतर कांहीं लकबी आहेतच. उदाहरणार्थ, जबडा पसरवून ओठांच्या या कोपऱ्यापासून त्या कोपऱ्यापर्यंत पसरविलेलं हास्य, कांहीं कारण नसतां रोखलेले डोळे, आश्चर्यावाचून चढविलेल्या भिवया, लटक्या व ओढून ताणून आणलेल्या चिंतेचे भाव, कुठलीहि जखम न होतां अंगाला पडलेली मुरड–इत्यादि. पण या सर्वांपेक्षा हुकमी पत्ता म्हणजे तिरपी मान! अर्थात् तुला मी साहित्यिकांच्या दावणींत गोवलं, तें निवेदनाच्या सोयीसाठी. कोट अडकवायला जशी खुंटी तसं माझं म्हणणं स्पष्ट करायला, मी तुझा उपयोग करून घेणार आहें. तुला एवढ्यापुरतंच मी साहित्यिकांत गोवलं, याबद्दल तूं माझं कौतुक करशील, अशी खात्री आहे.

तुम्हां सर्व लोकांची मान अशी तिरपी कां असावी? गुणाचा तोरा तुम्ही मानेच्या झटक्यांत तर दर्शवीत नाही ना? तसं असेल, तर तुमची मनोवृत्ति बालीश नाही काय? तुम्ही जर बालीश नसाल, तर तिरप्या मानेचे बावळट लोक आहांत, असं धरून चालायला प्रत्यवाय नसावा. तुम्ही जर बावळट नसाल, तर एक नंबरचे गर्विष्ठ असाल. आणि, मी नम्रपणें तुम्हाला सुचवूं इच्छितों की, तुमचा हा गर्व व्यर्थ आहे. गुणभाराने मस्तक लवायला हवं, गुणामुळे मान तिरपी का असावी, हे मला समजत नाही. कलावंतांत किंवा कोणत्याहि गुणी माणसांत आत्मविस्मृतीचा अंश असायला हवा. तुमची कृति सुंदर व्हायला आत्मविस्मृति आवश्यक नाही काय? कुठवर तुम्ही अभिमानाचं व अहंकाराचं जोखड वाहून आपली मान तिरकस करून घेणार आहांत? बाबा रे, ऐटींत मान तिरपी राखून रुबाबदार दिसण्याचा प्रयत्न करितां 'पण नेमक्या त्याच कारणामुळे आमच्यासारख्या चारचौघांत तुमचं हसूं होतं, हें तुम्हाला कळायला हवं. बोल, माझ्या साहित्यिक मित्रा, सर्व गुणी माणसांच्या वतीने बोल, तुमची तिरपी मान सरळ कधी होणार?......"

गुणी माणसांची मान फोटोंत तिरपी असते, हा माझ्या मित्राने लावलेला शोध मला मान्य आहे. पण त्याने केलेल्या अनुमानाशी–विशेषत: पत्राच्या शेवटीं शेवटीं प्रगट केलेल्या विचारांशी–मी बिलकूल सहमत नाही. मार्मिक निरीक्षण आणि चूक अनुमान असं त्याच्या पत्राचं वर्णन करितां येईल. डार्विनच्या सिद्धांताबद्दल असं सांगतात की, त्याने ज्या तपशिलाच्या जोरावर आपला क्रांतिकारक सिद्धांत मांडला, तो सगळा तपशील, ती सगळीं निरीक्षणं चूक होतीं, तरीहि त्याचा मुख्य सिद्धांत मात्र बरोबर होता. माझ्या मित्राच्या बाबतींत कांहीसा उलटा प्रकार झालेला आहे.

गुणी माणसाच्या तिरप्या मानेंत गर्व भरला असतो, हें मला एकदम कबूल आहे. इतकंच नव्हे, तर आपली मान तिरकस ठेवण्याचा गुणी माणसाला जन्मसिद्ध हक्क आहे, असंहि मला वाटतं. पण तिरप्या मानेंत साठलेला अभिमान गुणविषयक असतो, असं जे बहुतेक लोक माझ्या मित्राप्रमाणे समजतात, तें मला पटत नाही. माझ्या मतें, त्यांची ही समजूत दिशाभूलकारक आहे.

माझ्या मित्राचा रोख असा की, गुणी लोकांना जें हस्तगत झालं, जें त्यांच्या हातचा मळ बनून गेलं, त्याविषयी त्यांना अभिमान वाटतो. अगदी चूक आहे! एखाद्या लेखकाला आपण लिहितों म्हणजे शतकृत्य करतों असं वाटत असेल; एखाद्या गायकाला आपल्या तानांत कांही तरी जगावेगळं अलौकिक आहे, असं वाटत असेल; एखादा चित्रकार आपल्या कुंचल्याचा तोरा मिरवीत असेल आणि, जर एखादा 'मुत्सद्दी' आपले राजकीय डावपेच डोक्यावर घेऊन नाचत असेल, तर असं नक्की समजावं की, हा लेखक कॉलेजांतील होतकरू विद्यार्थ्यांपैकी एक आहे; हा गायक कॉलेजांतल्या संगीतचक्राचा सभासद आहे; हा चित्रकार वार्षिक

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

स्नेहसंमेलनांत बक्षीसं आणि वाहवा मिळविण्यास धडपडणारा किशोर–कलावन्त आहे आणि हा राजकारणी कॉलेज युनिअनच्या अध्यक्षपदासाठी किंवा इतर जागेसाठी जिवाचं रान करणारा बाल-राजकारणी आहे! उलट जसजसं एखाद्या गुणी माणसाचं मन, त्याचं आयुष्य, त्याचं अस्तित्व त्याच्या गुणाने संपृक्त होत जातं, त्याच्या गुणाला सार्वत्रिक मान्यता मिळत जाते, तो यशस्वी गुणी माणूस होत जातो, तसतसा त्याचा तद्विषयक अभिमान कमी कमी होत असतो. जितका माणूस जास्त गुणी, तितका त्याला आपल्या गुणाचा अभिमान कमी. जें जगन्मान्य झालं आहे, प्रत्येकाच्या डोळ्याला स्पष्ट दिसत आहे, तें मानेच्या झटक्याने सिद्ध करायची अर्थातच त्याला गरज नाही. अर्ध्या हळकुंडांत पिवळं व्हायची अवस्था संपल्यावर गुणी माणसाला त्याच्या गुणाचा गर्व तर होत नाहीच, उलट अजून किती तरी मार्ग काढायचा आहे, अशी त्याला तीव्रतर जाणीव होत जाते. त्याने ठरविलेलं पटुत्वाचं क्षितीज दूर दूर पळत जातं व तो सारखा लीन होत असतो. कलावंता-सारखे लाजाळू आणि लीन लोक इतरत्र क्वचितच सापडतील. त्यांच्या अदबीची, नम्रतेची आपण पुष्कळदा थट्टा सुद्धा करितों. असं असतां त्यांना आपल्या गुणाचा गर्व वाटतो, असं म्हणायचा दुतोंडीपणा आपण कां करावा!

कलावंतांची किंवा इतर गुणी माणसांची मान तिरपी नसते असं मला कधींच म्हणायचं नाही. पण त्यांच्या अभिमानाचं कारण लोक बहुधा समजतात तसं नसतं, हें माझं म्हणणं. उदाहरणाने माझी बाजू स्पष्ट होईल. एखाद्या तरुणाच्या मनांत एखादी तरुणी ठसली तर तो तिच्या दारावरून खेपा घालील; तिचा मागोवा घेईल, एखाद्या कोपऱ्यावर तिला वळतांना बघून उद्गार काढील, "काय मोहक आहे तिची चाल!" तिचं वर्णन करकरून तो आपल्या मित्रांचं डोकं पिकवील. त्याला जर तिने उत्तेजन दिलं, तर त्याचं अस्मान ठेंगणं होईल. पण तिच्याशी त्याचं पुढे लग्न झालं, तीं एकमेकांशी कायमचीं बांधलीं गेलीं, तर मात्र तो मूर्ख असल्याशिवाय तिच्या सुंदरतेचा क्वचितच उहापोह करील. कुणी त्याच्या बायकोच्या सौंदर्याचा विषय काढला, तर तो विषय टाळण्याचा त्याचा प्रयत्न राहील. त्याला जर चुकून तिची तारीफ करण्याची लहर आली, तर तो तिच्या पाकनैपुण्याबद्दल बोलेल, शिवणकामाची स्तुति करील, संसारदक्षतेबद्दल बोलूं लागेल; आणि, खरं म्हणायचं म्हणजे बिचाऱ्याच्या बायकोचे हे गुण जेमतेमच राहतील! माझ्या म्हणण्याचा आशय असा की, गुणी लोक जो अभिमान मिरवितात, तो त्यांच्या यशाचा नसतो. त्यांचं जें अंग यथातथाच आहे, तें तसं नाही, त्याहि बाबतींत त्यांचं आसन मजबूत आहे, हें दाखविण्याचा त्यांचा सतत प्रयत्न चालूं असतो. पूर्णतेच्या प्रदर्शनापेक्षा अपूर्णतेवर आच्छादन टाकण्याचाच गुणी माणसांचा सतत यत्न असतो. एखाद्या कसलेल्या राजकारणी पुरुषाला भेटा. तो राजकारणावर विशेषसं बोलणार नाही. तो साहित्य किंवा तत्त्वज्ञान यांचाच जास्त उहापोह करील. सामाजिक प्रसंगांत चर्चिल राजकारणाची चर्चा नसेल करीत. त्यांच्या गप्पांचा मुख्य रोख आपलं चित्रकलेचं ज्ञान किती खोल आहे, हें दाखविण्याकडेच राहील, असा माझा अंदाज आहे. उघडच आहेः चर्चिल जेवढा ख्यातनाम राजकारणी आहे, तेवढा थोर चित्रकार नाही. चंद्रशेखर रमण विज्ञानाबद्दल किंवा 'रमण किरणा' – बद्दल कामावाचून क्वचितच बोलतील. संगीताची आपली अभिज्ञता मात्र ते वेळोवेळी प्रगट करीत असावेत! एखादी प्रथितयश नटी आपल्या अभिनयाबद्दल बोलतांना लाजेल. तिचा आवडीचा विषय म्हणजे तिच्या साड्या किंवा कदाचित् तिची साधी राहणी. दुसऱ्या एखाद्या नटीजवळ तिच्यापेक्षा अधिक साड्या असणं नेहमीच शक्य असतं. तिच्यापेक्षा साधे राहणारे किती तरी लोक असूं शकतात. म्हणूनच ती या बाबतींत आपण मागे नाही, हें दाखविण्याचा सतत प्रयत्न करील किंवा कदाचित् ती ललित साहित्यांतील आपली रसिकता पटवून देण्याची शिकस्त करील. थोडक्यांत सांगायचं म्हणजे, यश मिळविण्यापेक्षा अपयश झाकण्याकडेच गुणी लोक तिरप्या मानेचा

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

उपयोग करतात. गुणी माणसंच कशाला? चार चौघांसारखी सामान्य माणसं नाहीत का नेहमी कुरकुरत "माझा हातच अपेशी! मी सर्वांसाठी इतकं केलं, पण माझं कुणीच झालं नाही! पण हरकत नाही!"—असं म्हणणारी व्यक्ति सर्वत्र आहे. ती आपल्यांत सुद्धा कुठं तरी अंतर्यामीं खोल खोल बसली आहे. "पण हरकत नाही"—असं ज्या वृत्तीपायीं सामान्य माणूस म्हणत असतो, त्याच वृत्तीमुळे गुणी माणसांची मान तिरकस होते. तिरपी मान जगाला नेहमी सुचवीत असते, "तुम्ही म्हणतां माझ्या गुणापायीं, या छंदापायीं, या नादापायीं माझं आयुष्य मी बरबाद केलं. पण तुमची कल्पना चूक आहे. माझं आयुष्य मुळीच बरबाद झालेलं नाही. मी ज्या तऱ्हेने वागत आलों, त्या वागण्यामुळे माझं कांहीं एक नुकसान झालं नाही! माझं जीवन सर्वतोपरी सुखी आहे. तुमच्या या अनवश्यक सहानुभूतीची मला बिलकूल गरज नाही!" ज्या अपयशाने माणूस साधारणपणें चिडका बनतो, त्या अपयशाचं अस्तित्वच गुणी माणूस आपल्या तिरप्या मानेने अवलक्षितो. "With no regrets" "ना खेद ना खंत"—असा गुणी माणसाच्या तिरप्या मानेचा अर्थ आहे! त्यामुळेच त्यांच्या आयुष्याला रंग येतो. म्हणूनच गुणी माणसाची तिरपी मान हिरावून घेण्याचा कुणी प्रयत्न करूं नये. स्त्रियांचं लाजणं त्यांच्यापासून काढून घेतल्यासारखं व्हायचं तें! गुणी माणसांना त्यांच्या गुणांच्या खालोखाल कांहीं प्रिय असेल, तर त्यांची तिरपी मान. ती हिसकावून घेणं किंवा तिचा भलताच अर्थ लावणं अरसिकतेचं होईल!

मला आठवतं, एका गाजलेल्या चित्रपटाचा दुसरा 'शो' पाहून मी परत येत होतों. मध्यरात्रीचा सुमार होता. अंधार काळाकुट्ट आणि रस्त्याने ये जा अगदीच कमी. माझ्याच रस्त्याने एक म्हाताराहि चालला होता. बराच वेळ आम्ही बोललों नाही. पण शांतता आम्हाला असह्य होतांच आम्ही बोलूं लागलों. दोघांनाहि सोबत मिळाली. तो म्हातारा नाट्य, अभिनय, कथाशास्त्र—इत्यादींचा चांगला जाणता असावा पण त्याचा प्रयत्न शक्यतोंवर आपलं ज्ञान लपविण्याचा होता. त्याचं आयुष्य कष्टी असावं, पण तेंहि तो झाकीत होता. या वयांत असं एकटं मन रमविण्यासाठी बाहेर पडायचं एरवी त्याच्या नशिबीं कां यावं? पण गृहस्थ माझ्याशी बोलतांना सारखा हसत होता. त्याच्या विनोदी खेळकर बोलण्यामुळे आमच्या दोघांच्या वयांतील अंतर मी विसरून गेलों. म्हातारा इतका गोड होता! वरचंस अंतर चालून गेल्यावर आमचे मार्ग फुटायला आले. अंधारांत साथ दिल्याबद्दल गहिवरून माझे त्याने आभार मानले. गृहस्थाचे शेवटचे शब्द मोठे झकास होते, "कांहीं विशेष बघायला मिळेलसं वाटलं होतं. म्हटलं, एवढा गाजला बोलपट-प्रेमपट. आपण आता म्हातारे झालों तेव्हा तरुणांचे प्रेमाचे कांहीं नवीन प्रकार आजकाल अस्तित्वांत आले असतील, ते बघावे. पण कांहीं नाही! आम्ही देखील आमच्या वयांत असंच प्रेम करीत होतों. तरुण लोक आजकाल कला थोडा अधिक करितात. नाही तर प्रेमाबद्दल काय शिकविणार आहेत म्हणा ते आम्हांला?"

त्या म्हाताऱ्याचं सगळं स्वभावचित्र; जीवनचित्र त्याच्या त्या बोलण्याने माझ्या डोळ्यांसमोर उभं केलं. त्याचं छायाचित्र पाहिलं नसलं, तरी माझी खात्री होती की, त्यांत त्याची मान तिरपीच असली पाहिजे!

• • •

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

साहित्यसमालोचन

संपादक

१ पुष्करिणी (ले. वसंत हेवळे 'कुसुमाकर;' प्र. सौ. शांताबाई मोहिले, बी. ए., एलिस ब्रिज, अमदाबाद, किं. रु. २)—या पुस्तकांत वसंत हेवळे ऊर्फ 'कुसुमाकर' यांच्या सदतीस कविता संग्रहीत केलेल्या आहेत. 'कुसुमाकरां'ना उत्कट भावना, सरस कल्पना व प्रसन्न भाषाशैली हे गुण रचनेंत उतरविण्याची कला चांगली साधलेली असल्यामुळे त्यांच्या बहुतेक कविता वाचनीय झाल्या आहेत. निरनिराळ्या वृत्तांवरहि त्यांची हुकमत असलेली दिसते. या संग्रहांतील 'मूक-गीत' हें चिमुकलें भावगीत मला विशेष उल्लेखनीय वाटतें. इतरहि कवितांची पातळी वरच्या दर्जाची आहे.

'कुसुमाकर' हे तरुण कवि आहेत. यामुळे त्यांच्या कवितेंत जीवितविषयक निश्चित दृष्टिकोन किंवा पृथगात्मता अद्यापि दृग्गोचर होत नाही. तथापि ते तरुण असल्यामुळेच त्यांच्याविषयीं आशा करण्यास भरपूर जागा आहे.

सध्याच्या नवोदित कवींत 'कुसुमाकरां'चा उल्लेख व्हावयास पाहिजे. तो का होत नाही, याचें आश्चर्य वाटतें! कदाचित् त्यांच्या पाठीशीं त्यांचा 'उदो उदो' करणारा कंपू नसावा!

२ दुहिता (ले. वि. ज. सहस्रबुध्दे; प्र. नारायण तंमाजी कातगडे, प्रमुख स्नेहसंवर्धक संघ, मिरज, किं. रु. २)—मिरजचे साक्षेपी साहित्यिक वि. ज. ऊर्फ तात्याबुवा सहस्रबुध्दे यांच्या अठ्याहत्तर कवितांचा हा संग्रह आहे. 'पद्यमीमांसा' या सुंदर पुस्तकामुळे छंदःशास्त्राचे अधिकारी विद्वान् म्हणून तात्याबुवा अभ्यासकांस परिचित झालेच आहेत. आता 'दुहिते' मुळे त्यांच्या रसिकतेचाहि त्यांस प्रत्यय येत आहे.

तात्याबुवा हे स्वतः फार साधे व सज्जन गृहस्थ आहेत आणि त्यांच्यासारखीच त्यांची ही 'दुहिता'हि आहे, 'दुहिते'तील कवितांत साधे विकार-विचार साध्या पद्धतीने साध्या भाषेंत मांडलेले आहेत, एवढें म्हटलें, म्हणजे त्यांच्या-विषयीं अधिक विवेचन करण्याचें कारण उरत नाही. मात्र नेमक्या याच गोष्टीमुळे या कवितांत आकर्षकता कमी प्रमाणांत उतरली आहे! विकार-विचारांची गाढता किंवा कांही तरी वैशिष्ट्य असल्याखेरीज रचना आकर्षक होत नाही. 'दुहिते'तील हें वैगुण्य जाणवल्याखेरीज राहत नाही!

३ यमुनाजळीं (ले. बाळशंकर देशपांडे; प्र. शंकर वामन कुळकर्णी, महाराष्ट्र-ग्रंथभांडार, मुंबई ४. किं. रु. २।)—मुळचे उमरखेडचे, पण हल्लीं मुंबईस असलेले बाळशंकर देशपांडे यांचे चौदा लघुनिबंध व लघुकथा या पुस्तकांत दिलेल्या आहेत. 'यमुनाजळीं' व 'इंग्रजी झेंडू' या लघु-कथा आणि 'मुक्तछंद,' 'परदुःख' व 'तयार कपडे' हे लघुनिबंध वाचनीय आहेत. देशपांडे यांची लेखनशैली अतिशय चटकदार आहे. सुंदर कल्पना, चमकदार सुभाषितें व खोचक उपरोध यांचा उपयोग करण्यांत त्यांचा हातखंडा आहे. भाषे-वरहि त्यांचें उत्तम प्रभुत्व आहे. या गुणविशेषां-मुळे हें सारेंच पुस्तक वाचनीय उतरलें आहे.

४ दीपिका (ले. व प्र. बाळकृष्ण मार्तंड दाभाडे, एम्. ए., छत्रीबाजार, लष्कर, ग्वाल्हेर. किं. ·॥·) बा. मा. दाभाडे ऊर्फ शशांक यांनी ही तीन अंकी चिमुकली नाटिका सत्याग्रहाच्या चळवळीच्या पार्श्वभूमीवर लिहिलेली आहे. तिच्यांतील संवाद चटकदार साधले आहेत. औंधच्या राजकुमारींनी या नाटिकेचा यशस्वी प्रयोग केला होता, असें लेखक 'निवेदनां'त सांगतात, तें लक्ष्यांत घेतां शाळा-कॉलेजांतून या नाटिकेचा प्रसंगविशेषीं प्रयोग करतां येईल, असें वाटतें.

• • •

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

संपादकीय

लेखनाची ता. १-९-४७

कविश्रेष्ठ Bee गेले!

कविश्रेष्ठ Bee हे ३० ऑगस्ट १९४७ रोजीं छिंदवाडा येथे दिवंगत झाले, हें नमूद करण्यास मला फार दुःख होतें. 'युगवाणीं'त गतवर्षी त्यांच्या दहा कविता प्रसिद्ध झाल्या होत्या व त्यांच्या कविता हें 'युगवाणी'चें सर्वात मोठें आकर्षण होतें. अर्थात् त्यांच्या मृत्यूनें 'युगवाणी'ची अपरंपार हानी झाली आहे, हें उघड आहे.

Bee हे 'पिकलें पान' झालें होतें, या दृष्टीने त्यांचा मृत्यु अनपेक्षित नव्हता. तरी देखील एक श्रेष्ठ आधुनिक मराठी कवि दिवंगत झाला, याचें सर्वच काव्यभक्तांस दुःख वाटेल.

Bee हे स्वभावतःच प्रसिद्धिपराङ्मुख होते. यामुळे त्यांचा 'फुलांची ओंजळ' हा काव्यसंग्रह प्रसिद्ध होण्यापूर्वी त्यांची सर्वसामान्य वाचकांस फारशी माहिती नव्हती. यामुळेच Bee व त्यांचें काव्य यांच्याकडे रसिकांचें लक्ष्य वेधण्याची आवश्यकता होती. एरवीं Bee विषयीं माझ्या सारख्याला 'जादा' आदर होता, किंवा कांहीं 'खास' उद्देशानें त्यांचा मला डांगोरा पिटावयाचा होता, अशांतला भाग नाही!

Bee यांना स्वतःच्या ह्यातींत आपला अल्पस्वल्प का होईना, पण गौरव झालेला पाहण्यास मिळावा, अशा हेतूनें गतवर्षी 'युगवाणी' चा 'Bee-विशेषांक' काढण्यांत आला होता. तो अंक पाहण्यास ते विद्यमान होते, याचाच आता आनंद मानावयास पाहिजे!

Bee यांच्या 'फुलांची ओंजळ' संग्रहाची द्वितीयावृत्ति 'युगवाणी' चे प्रकाशक माझे मित्र रा. द. ना. ठाकूर हे लौकरच प्रसिद्ध करीत आहेत. ही आवृत्ति पाहण्यास Bee हे राहिले नाहीत, याचा ठाकूर यांस अतोनात खेद होत आहे, ही गोष्टहि येथे अवश्य नमूद करावयास पाहिजे!

'मौजे'चा रौप्यमहोत्सव-अंक

मुंबईच्या 'मौज' साप्ताहिकानें १५ ऑगस्टच्या स्वातंत्र्यदिनीं आपला रौप्यमहोत्सव अंक प्रसिद्ध केला आहे. 'मौज' पत्र सुरू होऊन पंचवीस वर्षें होतात. या निमित्तानें हा अंक काढण्यांत आला आहे. अलीकडे 'मौज' पत्रांत अंतर्बाह्य सुधारणा झाली आहे व एक आदर्श साप्ताहिक म्हणून त्याजकडे अंगुलिनिर्देश करतां येतो. अशा उच्च प्रतीच्या साप्ताहिकाचा हा रौप्यमहोत्सव विशेषांक त्याच्या लौकिकास साजेसा असाच निघाला असला पाहिजे, हें न सांगतांहि कळण्याजोगें आहे. महाराष्ट्राची गेल्या पाव शतकांत सर्वांगीण प्रगति कशी झाली, हें मुख्य सूत्र दृष्टीपुढे ठेवून या अंकांत तज्ज्ञांचे वाचनीय लेख देण्यांत आलेले आहेत, एवढें म्हटलें, म्हणजे पुरें. या अंकाबद्दल 'मौजे'च्या भागवत-बंधूंचें मी मनःपूर्वक अभिनंदन करतों व 'मौज' पत्रास दीर्घायुष्य चिंतितों.

साभार पोंच

सागर (मासिक) सं. शांताराम जैन, 'सागर' कार्यालय, ताजनापेठ, अकोला (वऱ्हाड). वार्षिक वर्गणी रु. ४॥-

—या नूतन भावंडाचें 'युगवाणी' स्वागत करते व त्यास दीर्घायु चिंतिते.

'युगवाणी' कडे पुढील नियतकालिकांचे 'स्वातंत्र्यांक' आलेले आहेत:—

१. 'महाराष्ट्र', नागपूर. २. 'तरुणभारत' नागपूर, ३. 'स्वदेश', नाशिक. ४. 'राष्ट्रमत', मुंबई. ५. 'किर्लोस्कर', किर्लोस्करवाडी. ६. 'चित्रमयजगत्', पुणें.

हे सर्वच अंक आपापल्या परीने चांगले आहेत. तथापि त्यांतल्या त्यांत 'किर्लोस्कर', 'स्वदेश' व 'राष्ट्रमत' यांच्या अंकांचा मुद्दाम निर्देश करावयास पाहिजे. या सर्व अंकांच्या संपादकाचें मी मनःपूर्वक अभिनंदन करतों.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मध्यप्रांत वऱ्हाड शाळाखात्याने आपल्या ता. ११-१-४७ च्या ऑर्डर नं 104/Genl I A अन्वयें 'युगवाणी' मासिकास लायब्ररीसाठी मंजूरी दिली आहे.

'रीटा' मुळें आकर्षक केस-उगवतात

केससमृद्धीसाठीं 'रीटा' हें एक नवीन साधन आहे. केसाच्या मुळांतील नैसर्गिक स्रवणास त्याने पोषण होते. खवड्यास व टक्कलास अटकाव होऊन अनुपम सौंदर्याचे लांब सुंदर केस उगवतात. त्याने खराब केसांना सुंदर चकाकी मिळते आणि वाकड्या केसासाठीं ते उत्तम आहे. 'रीटा' ची एक बाटली घेऊन तुमच्या केसांना अनुपम सौंदर्य द्या.

एका बाटलीची किं. १५आणे.

× प्रत्येक ठिकाणीं मिळते. ×

RITA
HAIR TONIC



व्हेटो कंपनी, जोन्स स्ट्रीट, मद्रास

डोंगरेंच्या बालामृताने
अशक्तमुलें सशक्त होतात

'युगवाणी' च्या प्रति व्हीलर बुक एजन्सीच्या मुंबई शहर व उपनगरांतील सर्व शाखांवर मिळतील.

युगवाणी मासिकासाठीं व्हीलर बुक एजन्सी वर्गणीहि जमा करील. एजन्सी, दादर, मुंबई १४, ह्या पत्त्यावर पत्रव्यवहार करावा अगर समक्ष भेटावे.

द. ना. टाकूर यांनी ठाकूर आणि कंपनी लि. च्या महेश्वर मुद्रणालयांत छापून 'युगवाणी' कार्यालय १९,४२९ मुधोळकर पेठ अमरावती, येथे प्रकाशित केलें.

अनुक्रमणिका

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ